
१



# स्त्रियांवरील हिंसा : बदलते स्वरूप, बदलती आव्हाने

## महाराष्ट्रातील स्त्रियांवरील हिंसाविरोधी कामाचा आढावा

तथापि
स्त्रिया आणि आरोग्य
संसाधन संवर्धन

तथापि
२०१०

# स्त्रियांवरील हिंसा:
# बदलते स्वरुप, बदलती आव्हाने

## महाराष्ट्रातील स्त्रियांवरील हिंसाविरोधी कामाचा आढावा

प्रकाशन: तथापि ट्रस्ट
७७ टि म वि कॉलनी, मुकुंदनगर
पुणे ४११३७
दूरध्वनी: ०२० २४२६०२६४
ईमेल: tathapi@tathapi.org
वेबसाइट: www.tathapi.org

मार्च २०१०

देणगी मूल्य: रु. २० फक्त

लेखन: मेधा काळे, ऑड्री फर्नांडिस, दीपा ठाकूर
मांडणी: वेण्डी डीक्रूझ

या आढाव्यामध्ये सहभागी झालेल्या सर्व व्यक्ती आणि संस्था-संघटनांचे आम्ही मनापासून आभारी आहोत. त्यांचे अनुभव व विचार तसंच त्यांनी दिलेला वेळ बहुमोल आहे. सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि जास्मिन पावरी यांचेही मनापासून आभार.

तथापि
स्त्रिया आणि आरोग्य
संसाधन संवर्धन



# स्त्रियांवरील हिंसा : बदलते स्वरूप, बदलती आव्हाने

## महाराष्ट्रातील स्त्रियांवरील हिंसाविरोधी कामाचा आढावा

तथापि गेली ८ वर्षं स्त्रिया आणि आरोग्याच्या क्षेत्रात संसाधन केंद्र म्हणून काम करत आहे. या काळात अनेकांशी झालेल्या चर्चा, स्त्रिया आणि पुरुषांनी सांगितलेले त्यांचे अनुभव, अनेक अभियानं, पाहण्यांमधून पुढे येणारे अनेक प्रश्न यामधून आम्हाला असं वाटत होतं की स्त्रियांवरील हिंसेसंबंधीचे कायदे, त्यांची अंमलबजावणी आणि हे सर्व अनुभव यात कुठेतरी तफावत आहे.

अनुभवांमधून पुढील गोष्टी प्रकर्षाने अधोरेखित होत होत्या -

- हिंसेचे अनेक प्रकार नव्याने वाढत आहेत, काही प्रकारची हिंसा जास्त तीव्र होत आहे.
- लग्नाच्या पद्धतींमध्ये बदल होत आहे, नवनव्या पद्धतींची भर पडत आहे.
- भू-संपादनाच्या प्रक्रियेत जमिनीला मोबदला म्हणून ज्या भागात अचानक पैसा हाती आला आहे तिथे हुंड्याची मागणी व रक्कम वाढत आहे.
- महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारची हिंसा समोर येत आहे.
- अनेक छोटी-मोठी अभियानं चालू आहेत. यातच त्यामानाने नवीन अशा पुरुषांसोबतच्या कामाचाही समावेश.
- यातील काही अगदी एककलमी कार्यक्रम. जसं - गर्भलिंगनिदान, कौटुंबिक हिंसा आणि मुली व स्त्रियांच्या अनैतिक व्यापाराविरोधातील अभियान
- स्त्रियांवरील हिंसा हा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे याकडे लक्ष जाऊ लागलं आहे. यामध्येच एचआयव्ही बाधित स्त्रियांवरील हिंसेचाही समावेश होतो. सरकारी रुग्णालयांमध्ये लैंगिक हिंसेसंबंधीचे प्रोटोकॉल लागू करण्याचा प्रयत्नही काही ठिकाणी चालू.

या पार्श्वभूमीवर स्त्रियांवरील हिंसेचा मुद्दा सखोलपणे समजून घेण्यासाठी काही गोष्टींचा आढावा घेण्याचं ठरवलं. यामध्ये खालील बाबींचा समावेश होता.

- हिंसाविरोधी जे काम चालू आहे त्याचं स्वरुप
- महाराष्ट्राच्या विविध भागातून आढळून येणारे हिंसेचे प्रकार
- हिंसेसंबंधी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा दृष्टीकोन/भूमिका
- हिंसेच्या स्वरूपात काही बदल झाले असल्यास त्यावरची कार्यकर्त्यांची मतं
- हे काम बळकट करण्यासंबंधीच्या सूचना/विचार आणि गरजा

या आढाव्यामध्ये 'कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण २००५' या कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधीचं काम आणि अनुभव फारसे नाहीत कारण इतर विविध गटांनी या कामाचा आढावा स्वतंत्ररित्या घेतला आहे.

राज्याच्या २१ जिल्ह्यांमधून ६४ संस्था-संघटना प्रस्तुत उपक्रमात सहभागी झाल्या होत्या.

प्रस्तुत कामाचा आवाका खूपच मोठा असल्याने प्रत्येक विभागातून निवडक-संस्था संघटनांना भेटी देण्यात आल्या. ज्या संघटना गेल्या अनेक वर्षांपासून हिंसेसंबंधी किंवा स्त्रियांच्या प्रश्नावर काम करत आहेत त्यांना आवर्जून भेट देण्यात आली. नवीन संस्थांपैकी ज्यांचं या प्रश्नावर किमान ५ वर्षं काम चालू आहे अशा संस्थांना भेट देण्याचं ठरवण्यात आलं. २०० संस्थांना पत्राने प्रश्नावली पाठवण्यात आली. विविध गटांसोबत काम करणाऱ्या; विशेषतः दलित, आदिवासी, मुस्लिम स्त्रियांसोबत काम करणाऱ्या संघटनांची माहिती आणि अनुभव यामध्ये यावा यासाठी आवर्जून प्रयत्न करण्यात आला. शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागातील संस्थांचा समावेश करण्यात आला.

संपूर्ण राज्यातील एकूण २१ जिल्ह्यातील ६४ संस्था-संघटनांची माहिती गोळा झाली. यामध्ये ३८ संस्थांना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. २४ संस्थांनी त्यांची माहिती पत्राद्वारे पाठवली. ४ संस्थांच्या कामाची माहिती वेबसाइट व उपलब्ध अहवालांवरुन घेण्यात आली. २ संस्थांनी अपुरी माहिती पाठवल्याने त्यांचा समावेश करण्यात आला नाही. विदर्भातील १२ मराठवाडा विभागातून १३, मुंबई विभागातून ११, पुणे परिसरातून १०, उत्तर महाराष्ट्रातून ९, दक्षिण महाराष्ट्रातून ६ आणि कोकण विभागातून ३ संस्थांची माहिती गोळा करण्यात आली. कोकणात ३ वैयक्तिक भेटी घेऊन माहिती गोळा करण्यात आली. यापैकी ३५ संस्था शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागात काम करतात. १४ संस्था फक्त शहरी तर १३ संस्था फक्त ग्रामीण भागात काम करतात. भेटींदरम्यान ३३ कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती रेकॉर्ड करण्यात आल्या आणि नंतर त्या लिहून काढण्यात आल्या.

संस्थेच्या कामाची माहिती घेताना स्त्रियांवरील हिंसेसंबंधी काम कधी सुरु झालं याची माहिती घेण्यात आली आणि तेच वर्ष कामाला कधी सुरुवात केली यामध्ये धरलं आहे. वरील ६४ संस्थांपैकी बहुतेक संस्थांनी १९८० नंतर हिंसेसंबंधी कामाला सुरुवात केली आहे. ६ संस्था ७०च्या दशकापासून या विषयावर काम करत आहेत तर वात्सल्य महिला वसतिगृह १९५४ पासून कार्यरत आहे.

पाहणीतील संस्थांपैकी १६ संस्थांचं काम १९८० च्या दशकात तर २० संस्थांचं काम १९९० च्या दशकामध्ये सुरु झालं आहे. काही संस्थांची स्थापना वेगळ्या उद्देशाने झाली पण नंतर काही निमित्ताने त्यानी या कामाला सुरुवात केली आहे.

१९७५ हे महिला वर्ष म्हणून जाहीर झालं. हे वर्ष आणि त्याला लागून आलेलं महिला दशक यापासून प्रेरणा घेऊन काही संघटना सुरु झाल्या. त्यामध्ये स्त्री मुक्ती संघटना, महिला दक्षता समिती, आदर्श महिला उद्योग व स्वाधार यांचा उल्लेख करायला हवा. त्याच्या दोनच वर्षं आधी १९७३ मध्ये मामासाहेब कुलकर्णी यांनी हुंडाविरोधी चळवळ सुरु केली. नागपुरातील स्त्री अत्याचारविरोधी परिषद, जळगावातील छात्रयुवासंघर्ष वाहिनी-जागृत महिला कृती समिती याही १९७०च्या दशकात सुरु झाल्या आहेत. समाजवादी महिला सभा १९६१ साली स्थापन झाली पण हिंसेच्या प्रश्नावरचं त्यांचं काम मात्र १९८० च्या दशकात सुरु झालं. सांगलीचं भगिनी निवेदिता प्रतिष्ठानही १९७०च्या दशकात सुरु झालं आहे.

१९८० च्या दशकामध्ये वेठबिगार मुक्तीच्या प्रश्नावर उभी राहिलेली वसईची श्रमजीवी संघटना, दलितांच्या हक्कांसाठी काम करणारं मानवी हक्क अभियान व सावित्रीबाई फुले महिला मंडळ आहे, महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्थापन झालेला नारी प्रबोधन मंच आहे, पुण्यातील मध्यमवर्गातील सुशिक्षित मुलींच्या हुंडाबळीच्या घटनांनंतर 'बोलत्या व्हा केंद्रां'पासून सुरुवात झालेला नारी समता मंच आहे. स्त्रीवादी दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरणासाठी स्थापन झालेलं मासूम, आरोग्याच्या प्रश्नावर काम करणारं गडचिरोलीतील आम्ही आमच्या आरोग्यासाठी आणि नाशिकच्या वचन या गटांनीही १९८०च्या दशकात काम सुरु केलं आहे. संघर्षात्मक कामासोबतच विधायक आणि संरचनात्मक कामाच्या उद्देशाने सुरु झालेल्या अनेक स्वायत्त संस्था-संघटना आणि डाव्या चळवळीतील अखिल भारतीय जनवादी महिला संघटना या दशकात स्थापन व कार्यरत झाल्या. मुंबईतील स्वाधार आणि महिला दक्षता समिती या स्वायत्त स्त्री संघटनादेखील १९८०-८२च्या सुमारास स्थापन झाल्या.

१९९० नंतर सुरु झालेल्या २० संस्थादेखील विविध प्रेरणांनी या कामात उतरलेल्या दिसतात. विकासाच्या कामाचे प्रकल्प राबवत असताना त्यातून महिला अत्याचाराचे प्रश्न पुढे आल्याने काही संस्थांनी हा मुद्दा हातात घेतला. या दशकामध्ये बचत गटांचं माध्यम आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि स्त्रियांना एकत्र आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरलं गेलं. त्या निमित्ताने बाया एकत्र आल्या आणि त्यातूनही हिंसेचे प्रश्न समोर आल्याने या विषयावर काम सुरु झाल्याचं दिसतं. जातीअंताच्या चळवळीत दलित स्त्रियांचे प्रश्न वेगळे असल्याने ते पुढे आणण्यासाठी महाराष्ट्र दलित महिला फोरम आणि परभणीतील सामाजिक न्याय आंदोलनाची स्थापना झाली तीही याच दशकात. व्यसनमुक्तीसाठी जळगावात १९९९ साली आधार संस्था सुरु झाली.

२००० सालानंतर हिंसेसंबंधी अनेक छोट्या-मोठ्या गटांनी काम सुरु केलं आहे. आदिवासी भागात, शहरी वस्त्यांमध्ये बचत गट, आरोग्य, शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, बाल-मजुरी, मुलांसाठी अभ्यासवर्ग अशी विविध प्रकारची कामं करणाऱ्या संस्था-संघटना यामध्ये आहेत. राजकारणातील स्त्रियांच्या सहभागावर काम करणाऱ्या महिला राजसत्ता आंदोलनामार्फत काम करणाऱ्या गटांनी स्त्रियांवरील हिंसेच्या विषयाला स्पर्श केला आहे. तर काही संस्था 'शक्य आहे' सारख्या आंतरराष्ट्रीय अभियानामार्फत जाणीव-जागृतीचं काम म्हणून हिंसेच्या प्रश्नावर उपक्रम घेत आहेत. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचं संरक्षण कायदा २००५ संबंधी काम करणारे गटही गेल्या २-३ वर्षापासून काम करत आहेत. हिंसेचे आरोग्यावर होणारे परिणाम या संबंधी २००७ साली नाशिकच्या वचन संस्थेने काम सुरु केलं आहे. भारतवैद्यक तयार करून आरोग्याच्या प्रश्नावर काम करणाऱ्या हॅलो मेडिकल फौंडेशननेही २००२ साली समुपदेशन केंद्र सुरु केलं आहे. अभियानं, शिष्यवृत्ती, कायदे साक्षरता या स्वरुपातील काम २०००च्या दशकात जास्त होताना दिसतं. बहुतेक संस्था-संघटना मर्यादित कार्यक्षेत्रात आहे.

**या पूर्ण आढाव्यामध्ये विशेषकरुन जाणवलेली गोष्ट म्हणजे बचतगटांचा आधारगट म्हणून केला जाणारा उपयोग. बचतगटाच्या माध्यमातून स्त्रियांना एकत्रित करणं, आर्थिक व्यवहार सुरु करणं यापलिकडे जाऊन या माध्यमाचा उपयोग बायकांवरील हिंसेविरोधात बायकांशी बोलण्यासाठीची एक जागा म्हणून होताना दिसतो आहे. प्रसंगी दबाव गट म्हणूनही त्याचा वापर केला जात आहे. मराठवाडा, विदर्भ आणि पुणे विभागात बचतगट, महिला मंडळं आणि महासंघ, देवदासी व परित्यक्ता स्त्रियांचा गट यांचा उपयोग आधारगट म्हणून केलेला आढळतो.**

उदा. १ गाव, २ वस्त्या, १ तालुका किंवा १ जिल्हा. विदर्भातील व मराठवाड्यातील प्रत्येकी एक संघटना अनुक्रमे संपूर्ण विदर्भात आणि मराठवाड्यात काम करते. काही संघटना १५०-२०० गावांमधून काम करत आहेत. ३ संस्था वेश्याव्यवसायातील स्त्रियांसोबत काम करतात तर २ संस्था प्रामुख्याने मुस्लिम स्त्रियांसोबत काम करत आहेत.

**एकूण संस्थांपैकी फक्त १७ संस्थांकडे काही ना काही प्रकारची आधारगृहाची व्यवस्था आहे. स्त्रियांसाठी सुरक्षित अशी निवाऱ्याची सोय फार तोकडी असल्याचं यातून दिसून येतं. मुंबई विभागात माहिती घेतलेल्या संस्थांपैकी फक्त दोनच संस्थांकडे आधारगृह आहे तर कोल्हापूर विभागात केवळ एकाच संस्थेकडे आधारगृहाची सोय आहे. विदर्भात यवतमाळ व अमरावती इथे आधारगृहंच नाहीत. येथील एका संस्थेच्या अनुभवांवरुन असं दिसतं की एकट्या स्त्रिया-परित्यक्ता, विधवांना जर घर सोडून जायचं असेल तर थेट नागपूरला पाठवावं लागतं.**

निवडलेल्या सर्व संस्थांच्या माहितीवरुन असं दिसून येतं की कौटुंबिक सल्ला मार्गदर्शनाचं काम सर्वात जास्त प्रमाणात चालू आहे. ६४ पैकी ४९ संस्था सल्ला केंद्राचं काम करतात. कायदेविषयक सल्ला एकूण ३१ संस्थांकडे उपलब्ध आहे. स्थानिक आधारयंत्रणांचा वापर २७ संस्थांनी केला आहे. यामध्ये गावपातळीवर, औपचारिक किंवा अनौपचारिक आधार गट तयार करणं, महिला दक्षता समिती तयार करणं आणि त्याद्वारे पीडित महिलेसाठी गावपातळीवर काही आधार उभा करणं या पद्धतीचं काम केलं जात आहे.



फोनवरुन मदतीची सेवा म्हणजेच हेल्पलाईन केवळ १० आहेत. काही हेल्पलाईन शासनाच्या सहकार्याने सुरु करण्यात आल्या आहेत पण बहुतेक ठिकाणी संस्थेच्या कार्यालयाचा नंबर किंवा कार्यकर्त्यांच्या घरचा नंबर हेल्पलाईनसारखा वापरला जात असल्याचं दिसून येतं. जालना येथील सत्यदीप महिला मंडळाच्या सेवेचा लाभ सर्वात जास्त म्हणजे १०५ स्त्रियांनी घेतला आहे.

प्रस्तुत उपक्रमात सहभागी झालेल्या ६४ पैकी ५७ संस्थांनी काही ना काही स्वरुपाचे जाणीवजागृतीचे कार्यक्रम घेतलेले आहेत. याअंतर्गत पथनाट्य, महिला मेळावे, शाळा-महाविद्यालयीन मुला-मुलींसोबत कार्यक्रम, पोस्टर प्रदर्शन, अंगणवाडी मदतनीसांचं प्रशिक्षण, प्रशिक्षकांचं प्रशिक्षण, कायद्याबद्दल जागृती, गृहभेटी, पत्रकं वाटणं, भाषणं, लेखन, कॅम्पस प्रशिक्षण, विवाहपूर्व समुपदेशन असे विविध कार्यक्रम घेतलेले दिसतात.

एकूण ४१ संस्था-संघटनांनी विविध अभियानं राबवली आहेत. यातील बहुतेक एकदाच घेतलेली अल्पमुदतीची अभियानं आहेत. लिंगनिदानविरोधी अभियान, कौटुंबिक हिंसाविरोधी अभियान, महिला हिंसाविरोधी पंधरवडा (२५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर) ही अभियानं मराठवाड्यात राबवली गेली. विदर्भामध्ये मैत्री दिन ते अहिंसा दिन या काळात भारतीय स्त्री शक्तीने Men Say No to Violence हे अभियान राबवलं. गडचिरोलीमध्ये मुली जगवा-समाज घडवा आणि निर्भय स्त्री-समृद्ध समाज ही अभियानं राबवली गेली. याव्यतिरिक्त कन्या-अत्याचारविरोधी अभियान अमरावतीच्या ११० गावांमधून २००२ ते २००८ या काळात राबवलं गेलं. संगमनेरच्या समता विचार प्रसारक संस्थेने एक वर्षभर कौटुंबिक हिंसाचार निर्मूलन अभियान राबवलं. बहुतेक अभियानांमधून गाव-वस्तीपातळीवर स्त्रियांपर्यंत आणि पूर्ण समाजापर्यंत स्त्रियांवरील हिंसेचा मुद्दा नेणं, संस्था त्यासंबंधी जे काम करते त्याची माहिती पोचवणं, नवीन कायद्यासंबंधी जागृती करणं हे उद्देश साध्य करण्यात आले. 'शक्य आहे महिलांवरील हिंसाचाराचा अंत' हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभियान महाराष्ट्रातील काही संस्थांनीही राबवलं आहे.

सध्या स्त्रियांवरील हिंसेविरोधात राज्य/राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघ आणि इतरही निधी देणाऱ्या संस्था व्यापक अभियानं राबवत आहेत. ही अभियानं बहुधा एकच मुद्दा घेऊन कार्यक्रम आखतात. उदा. गर्भलिंगनिदान किंवा कौटुंबिक हिंसाचार

महाराष्ट्रामध्ये विविध भागात काही व्यापक अभियानं राबवली गेली. संयुक्त राष्ट्रसंघ जनसंख्या निधी आणि पॉप्युलेशन फर्स्ट यांनी संयुक्तरित्या राबवलेले लाडली अभियान, ऑक्सफॅम जीबीचे अर्थसहाय्य असणारे वी कॅन (शक्य आहे), डीएफआयडी आणि पॅक्स सहाय्यित लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड व सांगली जिल्ह्यातील ट्रॅफिकिंग विरोधातील अभियान आणि बेल बजाओ हे ब्रेकथ्रू या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेने महिला बाल कल्याण विभाग आणि युनिफेम यांच्या सहकार्यातून राबवलेलं दूरदर्शनवरचं अभियान ही त्यातली काही महत्त्वाची अभियानं. बेल बजाओचे काही कार्यक्रम औरंगाबादमध्ये घेण्यात आले. २००९ पासून युएनएफपीएने इतर युएन संघटनांसोबत स्त्रियांवरील हिंसा थांबवण्यासाठी पुरुषंसोबत संवाद सुरु केला आहे.

बऱ्याच अभियानांच्या हेतू आणि उपक्रमातले विरोधाभास विचार करायला लावणारे आहेत. या अभियानांचा हेतू मुली आणि स्त्रियांच्या अधिकारांचं रक्षण आणि हिंसेचा अंत असा असला तरी प्रत्यक्षात मात्र केवळ एकाच मुद्द्यावर सुरु असलेली ही अभियानं कार्यक्रम राबवताना मुली आणि स्त्रियांच्या अधिकारांवर गदा आणू शकतात. हिंसेचा अगदी वरवरचा अर्थ लावून राबवलेले उपक्रम फायदेशीर न ठरता कधी कधी घातकच ठरु शकतात. अनेकदा हिंसाविरोधी कामाचा कसलाच अनुभव पाठीशी नसणाऱ्या संस्था-संघटनांकडे अशा विषयांवरील प्रकल्प गेल्यामुळेही हे घडते.

याचं एक ठळक उदाहरण म्हणजे गर्भलिंगनिदान विरोधातील अभियानं. खरं तर स्त्रीभ्रूण हत्या या शब्दाचा वापरच स्त्रियांच्या गर्भपाताच्या अधिकारावर गदा आणू शकतो. गर्भपाताचा अधिकार मान्य करत असूनदेखील हत्या, कत्तल, खून अशा शब्दांच्या वापरामुळे समाजात गर्भपाताबद्दलच नकारार्थी भावना तयार होऊ शकते/होण्याचा धोका असतो.

असंच एक उदाहरण आहे ट्रॅफिकिंग विरोधातील अभियानाचं. मुली आणि स्त्रियांचा अनैतिक व्यापार रोखणं आणि त्यासाठी सतर्क राहणं गरजेचं आहे. पण तेवढाच एक उद्देश समोर ठेऊन राबवलेल्या उपक्रमांमुळे कधी कधी मुली आणि स्त्रियांच्या संचारावर/हिंडण्या-फिरण्यावर नजर ठेवली जाऊ लागते आणि आपोआपच मर्यादा येऊ लागतात. खासकरुन हिंसा, देहविक्रय का होतो याच्या व्यापक संदर्भाचा विचार न करता केवळ तरुण मुली आणि स्त्रियांच्या हालचालींवर पूर्ण देखरेख असं स्वरुप प्राप्त होऊ शकतं.


धर्माच्या शिकवणीतून, पोलिसांकडून, आणि न्यायालयांकडूनही स्त्रियांवर हिंसा/अन्याय घडत असतो. अनेकदा अभियानांच्या उद्देशांमध्ये/भूमिकेमध्ये हिंसेचे व्यापक संदर्भ लक्षात घेतलेले असतात. पण उपक्रम मात्र मर्यादित/संकुचित होऊन जातात. शक्य आहे आणि बेल बजाओ अभियानांमधूनही हेच दिसून येतं. कौटुंबिक हिंसा का होते, याचं विश्लेषणच मुळात कुटुंब आणि समाजाकडे 'हिंसा करणारे' या दृष्टीने पाहतं पण

शासनावर मात्र केवळ धोरणं आणि कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी टाकतं. याच विश्लेषणामध्ये 'पुरुष असणं' हे हिंसेचं कारण म्हणून नोंदवण्यात आलं आहे. हिंसेची अशी जीवशास्त्रीय मीमांसा पुरुषांसाठी तर घातक आहेच पण स्त्रियांसाठीही ती नकारार्थी आहे. पुरुष असणं हेच हिंसक आहे किंवा पुरुष निसर्गतःच हिंसक असतात या भूमिकेमुळे बदलासाठी काम करण्यास काहीच वाव राहत नाही.

**बेल बजाओ** अभियानाचं उदाहरण पाहूया. स्त्रियांवरील हिंसा हे मानवी हक्कांचं उल्लंघन आहे असं बेल बजाओ हे अभियान सांगतं. आता तसं पाहता स्त्रियांवरील हिंसेविरोधात काम करणाऱ्या सगळ्यांचे अनुभव आणि कामाचा आढावा घेतल्यावर असंच दिसतं की हिंसा ही केवळ चार भिंतीच्या आतच होत नाही. आणि अगदी जरी मानलं की ती तिथेच घडते तरी हिंसेचा संबंध घरापलिकडे, कुटुंबापलिकडे इतरही अनेक गोष्टींशी असतो. नोकरीसाठी, व्यवसायासाठी हुंड्याचा भांडवल म्हणून होणारा वाढता वापर, व्यसनं आणि दारूचं वाढतं प्रमाण, जमिनी प्रकल्पांसाठी संपादित झाल्यावर मोबदला म्हणून अचानक हातात येणारा पैसा अशा अनेक गोष्टींचा हिंसेशी संबंध आहे. हिंसा फक्त घरात घडत नाही; समाजाकडून, कायद्याच्या सदोष किंवा शून्य अंमलबजावणीतून त्यामध्ये भर पडू शकते. त्यामुळे हिंसा म्हणजे पत्नीच्या मानवी हक्कांचं पतीकडून होणारं उल्लंघन इतका संकुचित अर्थ लावून चालणार नाही. दारूचं/व्यसनांचं प्रमाण वाढतं आणि त्यातून हिंसाही वाढत आहे. दारूचं प्रमाण कधी नव्हे इतकं वाढलं आहे. का? वाढत्या बेरोजगारीत तर त्याची मुळं नाहीत ना? असेही अनेक प्रश्न आपल्यासमोर आहेत.

स्त्रियांवरील हिंसा हे स्त्रीच्या अधिकारांचं उल्लंघन आहे हे निश्चित. पण हे उल्लंघन व्यापक सामाजिक-आर्थिक आणि जात-वर्गाच्या संदर्भात घडतं. आणि त्याकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही.

**Figure 1. Model of factors associated with partner abuse**




**State**
- Legal norms and practices that reinforce male control of wealth and of decision-making at various levels
- Support for patriarchal notions of masculinity
- Inadequate legislation and policies, allowing perpetrators impunity

**Society**
- Norms granting men control of female behaviour
- Acceptance of violence as a way to resolve conflict
- Notions of masculinity linked to dominance, honour and aggression
- Religion and its interpretation
- Rigid gender roles

**Community**
- Poverty, unemployment, low socio-economic status
- Male peer groups condoning and fostering violence
- Social norms restricting women

**Relationship**
- Marital conflict
- Male control of wealth and decision-making in the family
- Inter-family conflict due to the extended family culture

**Perpetrator**
- Being male
- Witnessing marital violence as a child
- Being abused as a child
- Alcohol and drug use

*Towards Ending Violence Against Women in South Asia*
Oxfam Briefing Paper, August 2004

वरील विश्लेषण जोडीदाराकडून होणाऱ्या छळापुरतं मर्यादित आहे. ते जितकी उत्तरं देते, त्याहून अधिक प्रश्न

मांडते. पुरुषाचा सामाजिक-आर्थिक स्तर हे स्त्रियांवरील हिंसेचं कारण आहे का?

फक्त पुरुष असणं हेच स्त्री-जोडीदारावर होणाऱ्या हिंसेचं कारण आहे का?

स्त्रियांवरील हिंसा मान्य करणं, पुरुषवर्चस्वाची आणि लिंगभेदाची भावना दृढ करून स्त्रियांवरील हिंसेला खतपाणी घालणं हा केवळ सांस्कृतिक प्रघात किंवा रिवाज आहे का? उदाहरणार्थ, जोडीदारावरच्या हिंसेमध्ये जातीची काही भूमिका असते का? केवळ कायदे करणं यापलिकडे अशा बाबतीत राज्यसंस्थेची काही भूमिका असते का?

हे प्रतिमान स्त्रियांवरील हिंसेकडे सर्व जाती, वर्ग किंवा धर्मांमध्ये आढळणारा, पुरुषसत्ताकतेचा परिणाम म्हणून पाहत नाही. तर पुरुष असण्याबरोबरच गरिबी, बेरोजगारी निम्न सामाजिक-आर्थिक स्तर हेही घटक जोडीदारावरच्या हिंसेचं कारण असतात, असं हे प्रतिमान सुचवतं. अशी मांडणी धोकादायक आहे. पुरुष जन्मतःच हिंसक असतात आणि गरीब हिंसक असण्याची शक्यता अधिक असते, असं या प्रतिमानातून सुचवलं जातं. स्त्रियांवर होणारे कौटुंबिक अत्याचार हे काही केवळ जोडीदाराकडून होणाऱ्या छळापुरते मर्यादित नाहीत. ही गोष्ट कार्यकर्त्यांच्या बोलण्यातून सातत्याने पुढे आली आहे. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचारांमागच्या कारणांचं योग्य आणि सविस्तर विश्लेषण होण्याची गरज आहे.

या अभियानांच्या बाबत पुढील मुद्दे समजून घेणं आम्हाला आवश्यक वाटतं -

अ. जर बदल झाला असेल तर तो कसा झाला, आणि तो आवश्यक होता का?

ब. अशा प्रकारचं प्रतिमान कोण मांडत आहे, आणि त्यामागचा हेतू काय आहे?

स्त्रियांवरील हिंसेसंदर्भात केलेली ही पाहणी किंवा अभ्यास हिंसेच्या स्वरुपाबद्दल आणि निगडित घटकांबद्दल काही सूचित करते. राज्यभरातील विविध भागांमधील अनुभव आणि मतं या पाहणीत व्यक्त झाली आहेत. हिंसेबद्दल काय घडत आहे याचे काही निर्देशक, सूचक या अनुभवांमधून मिळतात. या मतांचं किंवा अनुभवांचं विश्लेषण करताना ज्या बाबींवर जास्त अभ्यास करण्याची गरज आहे त्या आम्ही या अहवालात अधोरेखित केल्या आहेत. हिंसेचे दिसून येणारे प्रकार, बदलते स्वरुप, हिंसेबाबत असणारे विविध दृष्टीकोन आणि हिंसाविरोधी काम, पद्धती यातील तफावत, फारकत समजून घेण्यासाठी जास्त सूत्रबद्ध पद्धतीने अभ्यास करण्याची गरज आहे. आर्थिक निधीच्या सहाय्याने चाललेले कार्यक्रम आणि कोणत्याही निधीविना झालेलं हिंसाविरोधी काम याबाबतही जास्त अभ्यासाची गरज जाणवते.

स्त्रियांवरील हिंसा समजून घेताना हिंसेचं स्वरूप आणि प्रकार समजून घेणं महत्त्वाचं ठरतं. कारण ज्या प्रकारची हिंसा घडते त्या प्रकारचे तिचे परिणाम असतात. हिंसेसंबंधी कामाचा आढावा घेत असताना त्या त्या विभागातून सर्वात जास्त आढळणारी हिंसा कोणती याची माहिती घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. एकूण ६४ संस्था-संघटना-व्यक्तींपैकी ६० जणांनी हिंसेच्या प्रकारांबाबत आपले अनुभव मांडले आहेत. संस्था अथवा संघटना कोणत्या पद्धतीचं काम करते त्यानुसारही त्यांनी दिलेल्या माहितीत विविधता आढळून येते. संस्थेचं कार्यक्षेत्र, तिथली आर्थिक-सामाजिक परिस्थिती आणि संस्थेची कामामागची भूमिका, उद्दिष्टं यामुळेही हिंसेच्या विश्लेषणामध्ये फरक पडताना दिसतो. तरीही सध्या महाराष्ट्रामध्ये स्त्रियांवरील हिंसेचं स्वरुप काय आहे याचा अंदाज या माहितीवरुन बांधता येईल. हिंसेचा एखादा प्रकार कोण्या विभागात नोंदवला गेला नसल्यास तिथे त्या पद्धतीने हिंसा होतच नाही असा निष्कर्ष काढण्याचा मात्र या अहवालाचा उद्देश नाही.



महाराष्ट्रामधील विविध विभागात स्त्रियांवर होणारी हिंसा काय स्वरुपाची आहे हे पाहताना प्रत्येक विभागात हिंसेचे काही अगदी वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आढळले. त्या त्या विभागातील आर्थिक-सामाजिक स्थिती आणि राजकीय इतिहासानुसारही हिंसेचं स्वरुप बदलताना दिसत आहे. जे सर्वात जास्त आढळणारे प्रकार आहेत त्याबद्दल त्या त्या विभागात काम करणाऱ्या संस्था-संघटनांनी अनुभव-मतं व्यक्त केली आहेत. आणि त्याचसोबत हिंसेच्या स्वरुपात काही बदल होत आहेत का आणि असल्यास हे बदल काय आहेत हेही मांडलं आहे.

हिंसा म्हणजे मारहाण, शारीरिक छळ हे समीकरण फार जुनं आणि प्रचलित आहे. आणि ते काही प्रमाणात खरंदेखील आहे. हिंसेच्या प्रकारांमध्ये शारीरिक हिंसा सर्वात जास्त दिसून येते. ६०पैकी ३२ गटांनी शारीरिक हिंसा या प्रकाराचा उल्लेख केला आहे. गंभीर प्रकारची शारीरिक मारहाण; ज्यामध्ये फ्रॅक्चर होणं, कंबरेचं हाड मोडणं, चामडं निघेपर्यंत मारणं, चटके देणं, अंगावर गरम पाणी ओतणं असे प्रकार नोंदवले गेले आहेत. यासोबतच क्षुल्लक कारणावरुन मारहाण हा प्रकार किमान ३ विभागांमधून नोंदवला गेला आहे. 'भाजीत मीठ कमी पडलं' पासून ते मित्रासमोर केस विंचरले, काळी आहे, वागणं आवडत नाही अशा कोणत्याही कारणावरुन मारहाण होत असल्याचा अनुभव आहे. मारहाणीचं समर्थन करणारं एक विधान

म्हणजे 'बाईचं चुकतं म्हणून तिला मारलं' किंवा 'शिक्षा म्हणून मारलं' हा अनुभव दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, पुणे आणि मुंबई विभागातून पुढे आला आहे. हुंड्यासाठी वेडीवाकडी मारहाण होत असल्याचं उत्तर महाराष्ट्र आणि कोल्हापुरातून दिसून आलं आहे.

दारू पिऊन मारहाणीत वाढ झाल्याचं पुणे आणि मुंबई विभागातून समोर आलं आहे. एकूण ८ संस्थांनी दारू पिण्यामध्ये वाढ झाली आहे असं मांडलं आहे. विदर्भातला एक वेगळा अनुभव सांगावासा वाटतो. इथे मारहाण होते पण आता अवघड जागी, रक्त दिसणार नाही अशा पद्धतीने जास्त मारहाण होत असल्याचं पुढे आलं आहे. त्यातही जर बाईने तक्रार केली तर मारहाणीत वाढ होत असल्याचा अनुभव प्रकृती संस्थेने मांडला आहे.

**मानसिक छळ**

शारीरिक मारहाणीइतकंच प्रमाण आहे मानसिक छळाचं. मानसिक छळ, हिंसा वाढत असल्याचं अथवा शारीरिक छळाइतक्याच मोठ्या प्रमाणावर होत असल्याचं सर्वच विभागातून दिसून आलं आहे. ६० पैकी ३० गटांनी मानसिक हिंसेचा 'जास्त प्रमाणावर आढळून येणाऱ्या हिंसे'मध्ये समावेश केला आहे. शिवीगाळ, अपमान करणं, सतत माहेरच्या लोकांचा उद्धार करणं हे प्रकार तर नोंदवले गेले आहेतच; पण त्यासोबतच मनोरुग्ण ठरवण्याचा गंभीर प्रकारही पुढे आला आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राच्या भागातून हा प्रकार नोंदवला गेला आहे. जळगावात त्याला वेगळ्या प्रकारच्या हिंसेची जोड आहे. वासंती दिघे यांनी सांगितलेल्या अनुभवांनुसार एखाद्या बाईने जर घरचे छळ करतात किंवा हुंड्याच्या कारणावरून छळासाठी ४९८ अ ची केस कोर्टात दाखल केली तर विरोधी पार्टीकडून ती वेडी असल्याचा अथवा डिप्रेशनमध्ये असल्याचा दावा केला जातो आणि मग ती केस कोर्टात उभी राहत नाही. जळगावात मानसिक हिंसेची तीव्रता जास्त आढळून येते. राजकारणी लोकांच्या मोठ्या मानलेल्या घरांमध्ये सुनांवर प्रचंड दबाव असल्याचं दिसून येतं. मराठवाड्यामध्ये हिंसेच्या सर्व प्रकारांमध्ये मानसिक हिंसा सर्वात जास्त असल्याचं दिसतं.

पुणे विभागातून पुढे आलेला अनुभव म्हणजे नवविवाहित मुलींवर लग्नानंतर लगेचच्या काळात असणारा मानसिक दबाव. लग्नानंतर सासरच्या घरात मुलगी नवीच असते आणि तेव्हा तिला सर्वात जास्त आधाराची गरज असते. पण विशेषतः याच काळात तिच्यावर अपेक्षांचा दबाव जास्त असल्याचा अनुभव पुढे आला आहे.

मानसिक हिंसेचा एक नव्याने तीव्र होत जाणारा आणि सर्वत्र आढळून आलेला, वाढता पैलू म्हणजे संशय घेणं. बाईच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा मानसिक आणि शारीरिक छळ करणं हा प्रकार ६०पैकी २२ गटांनी नोंदवला आहे. कुठे जाते, कोणाशी बोलते, त्या व्यक्तीकडे का पाहिलंस, त्याच्याशी का बोललीस अशा तऱ्हेने संशय घेऊन एक तर बाईच्या हिंडण्या-फिरण्यावर बंधनं आणणं, अघोरी मारहाण करणं, बायकोला सोडून देणं अशी हिंसा नोंदवली गेली आहे. यामध्ये पुणे विभागात संशयावरून हिंसेचं प्रमाण सर्वात जास्त (१०पैकी ७ संस्था) नोंदवलं गेलं आहे.

## लैंगिक हिंसा

लैंगिक हिंसेचे विविध प्रकार नोंदवले गेले आहेत. २० गटांनी लैंगिक हिंसेची तीव्रता आपल्या अनुभवांमधून मांडली आहे. लैंगिक हिंसेमध्ये नवऱ्याकडून होणारी जबरदस्ती, घरच्या इतर पुरुषांकडून होणारं लैंगिक शोषण आणि घराबाहेर, कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा या प्रकारांचा समावेश होतो. मराठवाड्यामध्ये खासकरुन दलित महिलांवर मुकादम अथवा मालकाकडून होणारी लैंगिक हिंसा तीव्र होत असल्याचं मानवी हक्क अभियान आणि सावित्रीबाई फुले महिला मंडळाने मांडलं आहे. याव्यतिरिक्त गावाने दलित स्त्रियांची विवस्त्र धिंड काढणं याचाही उल्लेख झाला आहे. कोल्हापूर आणि कोकण विभागामध्ये तरुण मुलींना लॉजवर नेऊन त्यांच्याशी जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवणं आणि त्याच्या व्हिडिओ क्लिप करुन त्या विकणं, त्यातून धंदा करणं हा प्रकार वाढत असल्याचं नोंदवलं आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा जाहीर झाल्यापासून हॉटेल किंवा लॉजमध्ये खूप वाढ झाली आहे आणि त्यानंतर या प्रकारच्या हिंसेमध्ये वाढ झाली आहे असा अनुभव बॅ. नाथ पै सेवांगणाने मांडला आहे. मोबाइलमधून फोटो, क्लिप्स करुन त्याद्वारे ब्लॅकमेल करण्याचे प्रकार या दोन्ही विभागात नोंदवण्यात आले आहेत.

विदर्भामध्ये लैंगिक हिंसेसंदर्भात सर्वात जास्त अनुभव नागपूर आणि अकोल्यातील संस्थांनी मांडले आहेत. सध्या बाजारात सहज उपलब्ध असणाऱ्या ब्लू फिल्म्स, सीडी इत्यादी पाहून तशा प्रकारच्या संबंधांची मागणी नवरे करतात आणि नकार दिल्यास त्यावरुन मारहाण होते. शरीरसंबंधांना नकार दिल्यास मारहाणीच्या घटना वाढत असल्याचं विदर्भ आणि मुंबईमधून नोंदवलं गेलं आहे. घरात मेहुणीचं लैंगिक शोषण अथवा तिच्याशी लैंगिक संबंध ठेऊन बायकोचा छळ असा प्रकार ठाण्याच्या खासकरुन बिगर आदिवासी समाजामधून होत असल्याचा श्रमजीवी संघटनेचा अनुभव आहे. विवाहित पुरुषांचे अविवाहित अथवा अल्पवयीन मुलींशी संबंध असण्याचंही प्रमाण वाढत असल्याचं मत त्यांनी नोंदवलं आहे. जळगावच्या भागातील वासनाकांडाचा उल्लेख आला आहे तसाच तो इतर विभागातूनही आला आहे पण त्याची बाकी माहिती मिळालेली नाही. बायकोशी संबंध ठेवण्यास नकार देणं आणि त्याबद्दल तक्रार केल्यास तिच्यावर लैंगिक वासना जास्त असल्याचा आरोप करणं असाही प्रकार जळगावच्या भागात होत असल्याचा अनुभव वासंती दिघे यांनी मांडला आहे.

देवदासी प्रथा ही अनेक प्रकारे स्त्रियांच्या शोषणासाठी कारणीभूत ठरते. देवदासी झालेल्या बाईचं गावाकडून मोठ्या प्रमाणावर लैंगिक शोषण होतं हा अनुभव मांडला आहे कोल्हापूरच्या साधना झाडबुके यांनी. देवदासींप्रमाणेच तमाशात काम करणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक शोषणाचा प्रश्न गंभीर असल्याचं त्या सांगतात. सध्या किशोरवयीन आणि अल्पवयीन मुलींवर लैंगिक हिंसा वाढत असल्याचं मत ३ संस्थांनी मांडलं आहे. पुणे विभागात सार्वजनिक ठिकाणी अंगलटीला येणं, छेडछाड ही हिंसा वाढत असल्याचं नोंदवलं आहे.

## आर्थिक बाबींवरून हिंसा

आर्थिक हिंसा, पैशावरुन-संपत्तीवरुन-संपत्तीतील हिश्शावरुन होणारी हिंसा हा हिंसेचा एक विशिष्ट पैलू राज्याच्या काही भागांमधून आढळून आला आहे. यामध्ये मुख्यतः दोन पद्धतीने हिंसा होताना दिसते. एक म्हणजे नवऱ्याने घरात पैसे न देणं, बाईला अतिशय तुटपुंज्या पैशात घर चालवण्याची वेळ येणं. या प्रकारच्या जाचामुळे पुणे आणि कोकण विभागात बाया जवळजवळ निम्मा वेळ उपाशी राहत आहेत असा अनुभव चेतना

महिला विकास संस्थेच्या ॲड. असुंता पारधे यांनी मांडला आहे. असाच प्रकार विदर्भातूनही पुढे आला आहे. दुसरा मोठा प्रकार जो खासकरुन पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरांमधून दिसून येत आहे तो आहे नवऱ्याने स्वतः न कमवता बाईवर कमवण्याची, पैसे पुरवण्याची सक्ती करणं. पुण्यामधील नारी समता मंचाच्या अनुभवांवरुन असं दिसतं की बाईला कर्ज काढायला लावणं, स्वतः कर्ज काढणं आणि ती बाईला फेडायला लावणं, कर्ज काढून गायब होणं आणि मग देणेकऱ्यांचा ससेमिरा बाईच्या पाठी लागणं असे विविध प्रकार खासकरुन मध्यम वर्गामध्ये दिसत आहेत. अनेकदा बाईला वेगळं व्हायचं असतं पण नवऱ्याचं कर्ज मागे असतं आणि तो काहीच कमवत नसल्याने पोटगी किंवा काहीच खर्च मिळण्याची शक्यता नसते. त्यामुळे बाईची इच्छा असूनदेखील ती वेगळं होण्याचा निर्णय घेऊ शकत नाही अशाही काही केसेस नव्याने दिसत आहेत. आर्थिक कारणांवरुन बाईचं शोषण किती विविध पद्धतीने होत आहे याचा अंदाज यावरून येऊ शकतो.

बाईला संपत्तीत समान हिस्सा मिळावा यासाठी अनेक पातळीवर प्रयत्न चालू आहेत. पण याच हिश्शावरुन बाईचा छळ होत असल्याचं ठाण्याच्या आदिवासी भागातून दिसत आहे. विकासकामांसाठी जिथे जमिनी संपादित झाल्या आहेत आणि त्याचा मोबदला पैशामध्ये मिळाला आहे अशा ठिकाणी हिस्सा घेऊन येण्यासाठी बायांचा छळ होण्याच्या घटना घडताना दिसतात. त्याचसोबत आलेला पैसा बारवर उडवून घरी बाईवर हिंसा करण्याच्या घटनाही घडत असल्याचं विद्युत पंडित यांनी नोंदवलं आहे.

संपत्तीत हिस्सा द्यावा लागू नये म्हणून विधवा स्त्रियांवरील हिंसा वाढल्याचं कोल्हापूर, यवतमाळ, नागपूर व बीडमधून दिसत आहे. विधवा, एकट्या स्त्रियांना त्यांचा संपत्तीतला हिस्सा नाकारण्याच्या घटना वाढल्या आहेत. तसंच खासकरुन एचआयव्ही/एड्सने नवरा गेला असल्यास त्या विधवांना घरातून हाकलून देण्याच्या घटना कोल्हापूर आणि पुणे विभागातून नोंदवल्या गेल्या आहेत.

मोठ्या शहरांमधील जमिनीचे, घरांचे वाढते भाव हेही स्त्रियांवरील हिंसेला कारणीभूत ठरत आहेत. आईच्या नावावर घर असल्यास ते स्वतःच्या नावावर करुन घेण्यासाठी तिचा छळ करण्याच्या केसेस पुणे आणि मुंबई विभागात नव्याने घडत असल्याचा अनुभव ४ संस्थांनी नोंदवला आहे. पत्नीच्या माहेराहून १५ लाख रुपये घेऊन बांधलेल्या घराची किंमत कोटीच्या घरात गेल्यावर आता तिला तलाक देण्याची जी केस मुंबईतील एका संस्थेने नोंदवली आहे, ती याची प्रातिनिधिक मानायला हवी.

## हुंडा


हुंड्याचाही उपयोग भांडवल म्हणून होत आहे असा अनुभव मराठवाड्यातून आणि जळगावातून पुढे येत आहे. फक्त हुंडा घेण्यापुरतं लग्न करणं आणि नंतर बायको सोडून देणं व नंतर परत जास्त हुंडा घेऊन लग्न करणं असे प्रकार उस्मानाबाद आणि जळगावातून नोंदवले आहेत. आता उघडपणे हुंडा म्हणून मागणी केली जात नसली तरी सतत काही ना काही द्यावं, पैसे अथवा वस्तूच्या स्वरुपाच काही तरी देत रहावं यासाठी बाईचा छळ होत असल्याचा पुण्यातील सीफार संस्थेचा अनुभव आहे.

हुंड्यासाठी जाळून मारणं किंवा वेडीवाकडी मारहाण करणं हा प्रकार आता काहीसा कमी झाला असला तरी हुंड्याचा प्रश्न अजूनही आहेच असं मत १३ गटांनी व्यक्त केलं आहे. मराठवाड्यामध्ये आणि कोल्हापुरात

अजूनही हुंड्याची तीव्रता कमी झालेली नाही असं मत मांडण्यात आलं आहे. लग्न झाल्यानंतरही रिक्षा, टीवी किंवा इतर काही वस्तू आणण्यासाठी बाईचा छळ होतो असा मानवी हक्क अभियानाचा अनुभव आहे.

**एकट्या स्त्रिया व विधवांचा छळ**

एकट्या स्त्रिया आणि विधवांचा प्रश्न मुंबई व कोकण सोडून इतर सर्वच विभागातून मांडला गेला आहे. त्यातही मराठवाड्यामध्ये ४ संस्थांनी या प्रकारच्या हिंसेचा उल्लेख केला आहे. अगदी तरुण वयात बायका माहेरी परत पाठवल्या जातात. घटस्फोटाचं प्रमाण कमी आहे आणि दुसऱ्या लग्नाची रीत नाही, मधल्या काळात मुलं झाली असल्यास त्यांची जबाबदारी बायकांच्याच खांद्यावर असते. माहेरात किंवा सासरी संपत्तीत वाटा नाकारला जातो त्यामुळे एकट्या राहणाऱ्या स्त्रियांवर सर्वच बाजूने हिंसा होताना दिसते. जळगावामध्ये उच्च समजल्या जाणाऱ्या समाजामध्ये बाईने एकटीनं राहणं अजिबात मान्य नाही आणि परत आल्यास भावांकडून बहिणींना मारहाण होत असल्याचा अनुभव आहे. विदर्भामध्ये यवतमाळच्या भागात दुसरा कोणताच आधार नाही. त्यामुळे एकट्या राहणाऱ्या अथवा विधवा बायकांच्या आत्महत्यांचं प्रमाण जास्त आहे असा अनुभव मांडण्यात आला आहे. एकाहून अधिक लग्नं, दुसरं लग्न अथवा दुसऱ्या बाईशी संबंध आणि त्यातून होणारी हिंसा हाही प्रकार सर्वच विभागांमधून नोंदवण्यात आला आहे.




**हिंसेचे इतर प्रकार**

आंतरजातीय विवाहांना विरोध, स्वतःच्या मर्जीप्रमाणे लग्न न करु देणे या पद्धतीची हिंसा मुख्यतः कोल्हापूर आणि पुणे विभागातून पुढे आली आहे. स्वतःचा जोडीदार निवडण्याचा अधिकार मुलींना नाही आणि त्यातही जातीच्या भिंती जास्तच पक्क्या होत असल्याचं या अनुभवांवरुन दिसून येतं. एकतर्फी प्रेमातून मुलींवर हल्ले वाढत असल्याचंही कोल्हापूरच्या भागातून २ संस्था नोंदवतात.

गर्भलिंगनिदानासंबंधी ४ विभागांतील ९ संस्थांनी माहिती नोंदवली गेली आहे. त्यामध्येही कोल्हापूर आणि मराठवाड्यामधील संस्थांनी या प्रकारच्या हिंसेची तीव्रता अधिक असल्याचं सांगितलं आहे. गर्भलिंगनिवड करुन मुलगी असल्यास गर्भपात होतात हे आता वास्तव आहे. पण मुलगी जन्माला आली तर तिच्याकडे केलं जाणारं दुर्लक्ष आणि त्यातून आजारपण येऊन तिचा मृत्यू असा प्रकार जास्त दिसतो असं एका संस्थेनं नोंदवलं आहे. केवळ मुली होतात म्हणून बाईचा छळ होण्याच्या घटनांचा उल्लेख मराठवाड्यातील संस्थांनी केला आहे तर 'मूल होत नाही' म्हणून बाईचा छळ होतो हे मराठवाडा आणि कोकणामध्येही दिसून आलं आहे. मूल होत नाही, बाई कारणीभूत नाही तरी तिचा छळ करण्याचा प्रकार सिंधुदुर्गाच्या भागात मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचं बॅ. नाथ पै सेवांगणाच्या चारुशीला देऊलकर यांनी सांगितलं आहे.

या प्रकारांशिवाय हिंसेच्या इतरही काही प्रकारांची नोंद झाली आहे. यवतमाळमधील वेश्या वस्ती जाळून टाकणं आणि वेश्या व्यवसायातील स्त्रियांना जमीन न देणं, वेश्याव्यवसायासाठी मुली आणि स्त्रियांची खरेदी विक्री, लहान वयात लग्न अशा काही प्रकारांचाही त्यात अंतर्भाव आहे. दुसरीकडे राजकारणात उतरलेल्या स्त्रियांवर मारहाण, घर जाळण्याची धमकी अशा हिंसेचं वास्तव मराठवाडा आणि विदर्भातून पुढे आलं आहे आणि त्यावर काम करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली आहे.

# स्त्रियांवरील हिंसेकडे पाहण्याचा कार्यकर्त्यांचा दृष्टीकोन



महाराष्ट्रात अनेक संस्था सध्या स्त्रियांवरील हिंसेच्या मुद्द्यावर काम करत आहेत. या संस्थांमधील कार्यकर्ते हिंसापीडित स्त्रीशी कोणत्या दृष्टीकोनातून संवाद साधतात याचा त्या स्त्रीला योग्य न्याय मिळण्याशी आणि तिचा आत्मविश्वास परत मिळण्याशी फार जवळचा संबंध आहे. स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेचा विचार ते कसा करतात यालाही त्या स्त्रीच्या दृष्टीने फार महत्व आहे. या कार्यकर्त्यांशी बोलताना या अनुशंगाने काही गोष्टी समोर आल्या.

बहुतेक कार्यकर्ते स्त्रियांवरील हिंसेचा दारू आणि तत्सम व्यसनांशी संबंध लावतात. त्यासोबतच शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य आणि बेरोजगारी हे घटकही स्त्रियांवरील हिंसा वाढण्याला कारणीभूत असल्याचं त्यांचं मत आहे. अंधश्रद्धा, मांसाहार आणि आजकाल अगदी ग्रामीण भागातही सहज उपलब्ध असणाऱ्या ब्लू फिल्म्स यांचा संबंध स्त्रियांवरील हिंसेशी आहे असं त्यांना वाटतं. सोनोग्राफी यंत्रांची संख्या आणि लिंगनिदानाचं वाढतं प्रमाण यांचा जवळचा संबंध आहे असंही एक मत पुढे आलं आहे.

बऱ्याच कार्यकर्त्यांना असंही वाटतं की स्त्रियांनी आपल्या कर्तव्यात काही कसूर करू नये, त्या नीट वागल्या तर काही होणार नाही. जिथे आपलं चुकतं तिथे दुरुस्ती करायला हवी असंही त्यांना वाटतं.

सगळ्यात पहिला सल्ला हाच असतो की स्वतः चुकू नाही द्यायचं आपल्या कर्तव्यात. (आम्ही) हिंसेला विरोध करतो म्हणजे सगळं काही महिलांच्या बाजूने बोलतो, महिलांच्या चुकांवर पांघरूण घालतो असं नाही. आम्हीही म्हणतो की महिलांचं चुकत असेल काहीतरी! तर तुमचं ज्या गोष्टीत चुकत असेल तिथे त्या गोष्टीला वळण द्या आणि पुढे जा. पण जिथे महिलांचं चुकत नाही, जिथे जबरदस्त मारहाण होते किंवा तुम्ही बायका अशाच आहात असं म्हटलं जातं तिथे सगळ्यात आधी आमचं सांगणं असतं की मार खाणं बंद कर, हिम्मत आण की मार नाही खायचा. तूच हिम्मत नाही दाखविली तर कोणीच मदतीला येणार नाही. स्त्रियांनी आता याची तयारी करायला हवी.

वाढत्या स्पर्धेमुळे पुरुष अस्वस्थ बनत चालले आहेत. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यात त्यांना अडचण येत आहे. कामाच्या ठिकाणच्या अपयशाचा राग ते घरात बायको मुलांवर काढतात. स्त्रिया कामाच्या निमित्ताने घराच्या बाहेर पडताहेत आणि पुरुषांना रोजगार मिळत नाहीये. पुरुषांना हे सहजासहजी पचनी पडत नाहीये. बाईच्या बाहेर पडण्यावर नियंत्रण आणणं आणि संशय घेणं असे प्रकार यातूनच होताना दिसतात. पैसा आणि मालमत्तेच्या वादातूनही स्त्री पुरुषांमध्ये वाद होतात असंही कार्यकर्त्यांचं निरीक्षण आहे. किरकोळ कारणांवरून टोकाची वादावादी, भांडणं होतात. आपसातील साधे मतभेद आणि कुरबुरी सोडवण्यात पती-पत्नी कमी पडतात असंही त्यांना वाटतं. शिवाय धर्माच्या नावावर, उपासाच्या काळात, मासिक पाळीच्या दिवसांमध्ये हिंसेचं प्रमाण वाढतं आणि या छुप्या हिंसेबद्दल कुठे बोलताही येत नाही अशी परिस्थिती आहे.

परंपरा, जुन्या चालीरीती आणि अंधश्रद्धांचा जबरदस्त पगडा असलेल्या मारवाडी, सिंधी-गुजराथी या व्यापारी आणि पैसेवाल्या समाजाच्या स्त्रिया तर जास्तच कठोर बंधनात वावरताना दिसतात. या स्त्रियांवरील हिंसेसाठी वर उल्लेखिलेली कारणंही तेवढीच जबाबदार आहेत असं कार्यकर्त्यांचं म्हणणं दिसतं.

लग्न ही संस्थाच मुळात अतिशय भ्रष्ट आहे असं सीमा साखरे यांनी जोर देऊन सांगितलं. लग्न ठरवताना कुटुंबाची मानमर्यादा, प्रतिष्ठा, खानदानाचं कूळ-मूळ, मालमत्ता यांच्या समोर मुला-मुलींचा विचार, त्यांची इच्छा यांची किंमत पालापाचोळ्याइतकीही नसते. बाईच्या बाबतीत तर तिचं लग्न झालं आहे की नाही यावरूनच तिच्या अस्तित्वाला किती अर्थ आहे हे ठरतं.


काही कार्यकर्त्यांनी हेही सांगितलं की पितृसत्ताक विचारांचा इतका प्रभाव लोकांवर आहे की मुलींनी कुठला पेहराव करावा आणि कुठला नाही यावरही काही मंडळी निर्बंध आणतात. मुलींनी साडी, पंजाबी ड्रेस सारखे पोशाखच वापरावेत. शॉर्टसारखे पुरुषांना उत्तेजना देणारे पाश्चात्य कपडे त्या घालतात म्हणूनच त्या हिंसेला बळी पडतात अशा प्रकारची लोकांची मतं बदलणं खूप अवघड आहे याबद्दल कार्यकर्ते निराशाही व्यक्त करतात. शारीरिक हिंसेची कारणं जरी बदलत असली तरी हिंसा पूर्वीप्रमाणेच आणि त्याच प्रमाणात समाजात अस्तित्वात आहे. असं असलं तरी आज स्त्रिया आपल्यावरील अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवत आहेत, त्या बोलताहेत, समुपदेशन केंद्रात जात आहेत आणि मदत घेत आहेत असंही काहींनी सांगितलं.

शेवटी जात, पैसा आणि पुरुषप्रधानता हे तीन घटक जिच्या मुळाशी आहेत ती सत्ताच स्त्रियांवरील हिंसेचं मुख्य कारण आहे असंही मत काही कार्यकर्त्यांच्या बोलण्यातून स्पष्टपणे पुढे आलं.

## हिंसेच्या केसेस कोणत्या मार्गाने हाताळल्या जातात?

हिंसापीडित स्त्री जेव्हा समुपदेशन केंद्रात किंवा आधार केंद्रात येते तेव्हा ती खूप घाबरलेली असते. तिचा आत्मविश्वास गेलेला असतो. अशा वेळेस तिच्याशी बोलून तिला धीर देण्याची आवश्यकता असते. बऱ्याच कार्यकर्त्यांनी सांगितलं की अशा परिस्थितीत ते स्त्रियांना बोलण्यासाठी वेळ देतात, शांतपणे त्यांचं ऐकून घेतात. त्यातून तिला थोडा भावनिक आणि मानसिक आधार मिळतो. काहींनी सांगितलं की समुपदेशक म्हणून ते त्यांचं म्हणणं स्त्रियांवर लादत नाहीत तर काही उपलब्ध पर्याय सुचवतात.

'हळूहळू समस्येचं स्वरूप जाणून घेतल्यानंतर तिला मार्ग दाखवतो. आपण आपला निर्णय लादत नाही तर तिला पर्याय दाखवतो. पण तिला योग्य वाटणारा निर्णय ती स्वतः घेते.' (सुधा कुलकर्णी, मुंबई)




काहींना वाटतं की जर स्त्रियांना योग्यवेळी योग्य ती मदत मिळाली तर त्या निर्णय घेऊ शकतात आणि त्यांच्या परिस्थितीत बदल होऊ शकतो.

काही कार्यकर्त्यांनी सांगितलं की ते दोन्ही




प्रतिवादींशी संवाद साधतात, दोघांना समजावून सांगतात आणि वेळप्रसंगी संघटनेची ताकद दाखवून, कायद्याची भीती दाखवून दोघांमध्ये तडजोड घडवून आणतात. 'तू आत्मनिर्भर हो. प्रतिकार करायला शिक असं आम्ही हिंसापीडित स्त्रीला सांगतो,' असंही एका संस्थेने सांगितलं. त्यांचा सगळ्यात पहिला सल्ला हाच असतो की आपण स्वतः कधी चुकायचं नाही.

मी कमवते, मुलांचं करते, स्वयंपाक करते आणि तुलाही सांभाळते असं जर एखादी बाई नवऱ्याला म्हणेल तर ती ९०% सक्षम झाली असं म्हणता येईल.


एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून स्त्रीचा आदर राखला जावा, तिलाही पुढे जाण्याची संधी मिळायला हवी असं जर वाटत असेल तर बाईचं आत्मभान जागं होणं हाच एकमेव उपाय आहे. फक्त मुलांना जन्म देणारं यंत्र म्हणून तिच्याकडे ना पाहता एक परिपूर्ण व्यक्ती म्हणून तिच्याकडे पाहिलं जावं असं काही कार्यकर्त्यांना वाटतं. ते म्हणतात – जर आपण एकत्र आलो तर आपण हे चित्र नक्कीच बदलू शकतो. स्त्रियांमध्येही जिद्द आहे गरज फक्त एकीची आहे.

काहींच्या मते, स्त्रियांवरील हिंसा कमी व्हायची असेल तर हिंसेच्या, बलात्काराच्या केसेस कोर्टासमोर आणि समाजासमोर आणल्या गेल्या पाहिजेत. न्यायालयात न्याय मागणं सर्वांना शक्य आहे. एखाद्या केसमध्ये आरोपीला शिक्षा झाली तर त्यावरून दुसरी ५० माणसं धडा घेतील आणि हिंसेला थोडातरी आळा बसेल. लोकांनाही कळेल की कायदा आपलं काम करतो आणि स्त्रियाच्या संरक्षणासाठी कायदा आहे.

आम्ही देवाच्या, धार्मिक भावनांच्या विरुद्ध नाही पण देवदासीसारख्या प्रथांच्या रुपाने देवाच्या नावावर हे जे वाईट चाललं आहे त्याला आमचा विरोध आहे, असं काही कार्यकर्त्यांनी सांगितलं. वेश्याव्यवसायातील स्त्रियांच्या समस्या सोडवण्यासाठी, त्यांच्यावरील हिंसा कमी करण्यासाठी आम्ही काम करतो. हा व्यवसाय चालावा असं आमचं मत नाही. या कामातून स्त्रियांना लिंगसांसर्गिक आजारांची लागण होऊ नये म्हणूनही आम्ही त्यांना मदत करतो, असं या मुद्द्यावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी सांगितलं.

कार्यकर्त्यांनी दिलेल्या या माहितीतून महिलांवरील हिंसेच्या केसेस कशा हाताळल्या जातात, याचं चित्र उलगडतं.

# स्त्रियांवरील हिंसेसंबंधी काम करताना येणाऱ्या अडचणी



स्त्रियांवरील हिंसेसंबंधी काम करताना विविध प्रकारच्या अडचणी येत असल्याचं सहभागी गटांनी सांगितलं आहे. काही अडचणी या प्रत्यक्ष केसवर्क करताना येतात तर काही व्यापक पातळीवरच्या आहेत. समुपदेशन, कौटुंबिक सल्ला केंद्राच्या रोजच्या कामातील अडचणी यात अंतर्भूत आहेत आणि जनजागृती, अभियानाच्या पातळीवर समाजातून मिळणाऱ्या प्रतिसादासंबंधी, शासन म्हणून हिंसेकडे पाहण्याच्या भूमिकेसंबंधीही काही अडचणी आहेत.

प्रामुख्याने पुढे आलेल्या अडचणी काहीशा अशा आहेत-

१. समाजाची, सरकारची आणि पोलिस व इतर यंत्रणांची पुरुषसत्ताक मानसिकता

२. हिंसेसंबंधी कायद्यांमधला तोकडेपणा, अंमलबजावणीतील त्रुटी, कोर्टाच्या प्रक्रियेत वाया जाणारा वेळ आणि पैसा त्यामुळे येणारं नैराश्य

३. केसवर्क करताना, प्रत्यक्षात समुदायाच्या पातळीवर हिंसेविरोधात काम करताना येणाऱ्या अडचणी (उदा.-अपुरा वेळ, निधी, जागा, मनुष्यबळ आणि संसाधनं)

४. स्त्री चळवळीचा जोर कमी, योग्य भूमिका घेऊन काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांची उणीव, सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये संवादाचा अभाव

५. हिंसेच्या प्रश्नावरून राजकारण आणि राजकारणी लोकांचा हस्तक्षेप

६. स्त्रियांची अतिसोशीक मानसिकता, आत्मविश्वासाचा अभाव

## पुरुषसत्ताक समाजमानस

सहभागी संस्थांच्या मते समाजाची पुरुषसत्ताक मानसिकता, स्त्रियांना दुय्यम ठरवणारी रचना ही हिंसेविरोधात काम करताना सर्वात मोठी अडचण ठरते. हिंसेचा उगम या विषम समाजरचनेत आहे आणि स्त्री ही स्वतंत्र व्यक्ती आहे हा विचार समाजाच्या आणि खासकरुन पुरुषांच्या मनात रुजवणं हे मोठं आव्हान असल्याचं मत स्त्रीमुक्ती संघटना, श्रमजीवी संघटना, स्वाधार या संघटनांनी व्यक्त केलं आहे. पुरुषांची मानसिकता अजूनही आडमुठेपणाची आहे. बाईने केस दाखल केली तर पुरुषांकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. त्यातच बाईचं खच्चीकरण होतं असा अनुभव भगिनी निवेदिता प्रतिष्ठानच्या समुपदेशकांनी सांगितला आहे.

स्त्रियांना मारणं, शिवीगाळ करणं ही हिंसा आहे आणि त्याला विरोध करायला हवा हे समाजाने मान्य करणं हेच मुळात अवघड असल्याचं मनीषा तोकले यांनी मांडलं आहे. समाज म्हणून स्त्रियांवरील हिंसेविरोधात काही पाऊल उचलायला पाहिजे ही जाणीव अजून खूपच कमी प्रमाणात आहे त्यामुळे इतर कोणत्याही करमणुकीच्या कार्यक्रमांना गर्दी होते पण अशा विषयांवरील कार्यक्रमांना लोकांचा म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नाही, असं मत मालवण येथील बॅ. नाथ पै सेवांगणाच्या चारुशीला देऊलकर यांनी मांडलं आहे.

समाजाची पुरुषसत्ताक विचारसरणी शासन, पोलिस, प्रसारमाध्यमं आणि न्यायालयांमध्येही दिसते आणि तीही या कामातली मोठी अडचण असल्याचं ८ संस्था मांडतात. पोलिसांचं सहकार्य मिळत नाही, पोलिस असंवेदनशील आहेत, जेव्हा बाई तक्रार करायला येते तेव्हा तिला आवश्यक ते सहकार्य मिळत नाही असा अनुभव ४ संस्थांनी मांडला आहे. परंतु जिथे संघटना काम करते तिथे संघटनेच्या दबावामुळे पोलिस मदत करतात असं मत श्रमजीवी संघटनेच्या विद्युत पंडित, महिला फेडरेशनच्या मेघा पानसरे आणि आधार संस्थेच्या रेणुप्रसाद यांनी मांडलं आहे. परंतु संस्था ज्या क्षेत्रात काम करत नाही तिथे मात्र पोलिस सहकार्य करत नसल्याने प्रश्न सोडवताना अडचणी येतात असं रेणुप्रसाद यांनी सांगितलं आहे.

अनेकदा कायद्याला फाटा देऊन नियमबाह्य पद्धतीने तक्रार निवारण केंद्रातील केसेस पोलिस निरीक्षक कार्यालयाकडे पाठवल्या जातात. आणि तिथे जाण्यासाठी महिला कचरतात असं मत मानवी हक्क अभियानाच्या मनीषा तोकले यांनी मांडलं आहे.

पोलिस खातं/गृह खातं आणि महिला व बाल कल्याण खात्यामध्ये ताळमेळ नसल्याने जळगावमध्ये महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष सुरु करण्याची परवानगी असूनसुद्धा वर्षभर ते सुरु होऊ शकलेलं नाही, असा अनुभव आधार संस्थेच्या रेणुप्रसाद यांनी मांडला आहे. न्यायाधीश, पोलिस अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांना संवेदनशील करण्याची गरज असल्याचं मत रत्नागिरीच्या साहिल संस्थेने आणि मालवणच्या सेवांगणाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केलं आहे. दारूबंदी करण्यासाठीही पोलिसांचं सहकार्य मिळत नाही अशी अडचण पुण्यातील एका संस्थेने मांडली आहे.

## हिंसाविरोधी कायद्यांबाबत अडचणी

हिंसाविरोधी कायद्यासंबंधीही अनेक अडचणी असल्याचं सर्वच विभागातून पुढे आलं आहे. दूरवरच्या, अतिदूर भागात मोफत कायदे सल्ल्याची सोय नाही. शहरात अशी सोय असली तरी प्रवासखर्च परवडत नसल्याने बायका त्याचा लाभ घेऊ शकत नाहीत असा अनुभव मुंबईच्या सख्य संस्थेने सांगितला आहे. आवाज-ए-निस्वाँ संस्थेनेही मोफत कायदे सल्ला केंद्रांची गरज असल्याचं मत नोंदवलं आहे.

कोर्टाची संपूर्ण प्रक्रिया वेळखाऊ असल्याने लवकर न्याय मिळत नाही आणि त्यामुळे बाई तडजोड करायला तयार होते अशी अडचण सांगलीच्या भगिनी निवेदिता प्रतिष्ठानने आणि पुण्याच्या जनवादी महिला संघटनेने मांडली आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ या कायद्याची माहिती अजून सर्वांपर्यंत पोचलेली नाही व संरक्षण अधिकारी नेमले गेलेले नाहीत. जे नेमले आहेत ते संवेदनशील नाहीत अशी अडचण ३ संस्थांनी मांडली आहे. कायदेशीर मदत वेळेवर मिळण्यात अनेक अडचणी असल्याचं महाराष्ट्र दलित महिला फोरमने सांगितलं आहे.

एका संस्थेने स्त्रिया कायद्याचा गैरवापर करतात या पुरुषांच्या वृत्तीमुळे न्याय मिळण्यात अडचण येत असल्याचं सांगितलं आहे.

## केसवर्क करताना येणाऱ्या अडचणी

महिलांवरील हिंसेच्या केसेस सोडवताना येणाऱ्या अनेक अडचणी आढाव्यादरम्यान मांडल्या गेल्या आहेत. त्यामध्ये निधीची कमतरता ही अडचण सर्वात जास्त कार्यकर्त्यांनी सांगितली आहे. कार्यकर्ते आहेत, साधनव्यक्ती आहेत, बाकी सर्व सुविधा आहेत पण निधीअभावी जास्त लोकांपर्यंत पोचता येत नाही असा अनुभव दलित महिला विकास मंडळाच्या ॲड. वर्षा देशपांडे यांनी मांडला आहे. मराठवाडा विभागात गावं एकदम दूर आहेत, येण्याजाण्याच्या सोयी उपलब्ध नाहीत त्यामुळे निधी नसेल तर सर्व ठिकाणी महिलांपर्यंत पोचता येत नाही असं मानवी हक्क अभियानाने सांगितलं आहे. कोल्हापुरातील देवदासी प्रथेवर काम करणाऱ्या साधना झाडबुके यांनीही अपुऱ्या निधीमुळे काम करण्यात मोठा अडसर येतो असं सांगितलं आहे. निधीअभावी सर्वच कामांवर मर्यादा येतात असा अनुभव वचन संस्था आणि दलित महिला फोरमनेही मांडला आहे.

निधीप्रमाणेच मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याचं मत ३ विभागातून व्यक्त झालं आहे. ज्या तीव्रतेने हिंसा होते त्या प्रमाणात काम करणारे कार्यकर्ते नाहीत असा अनुभव या संस्थांनी मांडला आहे. या विषयावरील चांगलं साहित्य मिळत नसल्याची अडचण २ संस्थांनी मांडली आहे. कामासाठी वेळ कमी पडत असल्याची अडचण कोल्हापूरहून अनुराधा गायकवाड यांनी मांडली आहे.

आधारगृहांची कमतरता ही मोठी अडचण असल्याचंही बऱ्याच जणांनी नोंदवलं आहे. आधारगृहं नसल्यामुळे कार्यकर्त्यांना स्वतःच्याच घरात निराधार बायकांना जागा द्यावी लागत असल्याचं विविध भागांतून दिसून आलं आहे. संवेदनशील यंत्रणा अस्तित्त्वात नसल्यामुळे या बायकांची तात्पुरती सोय करावी लागते आणि त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांवर कधी कधी दबाव येतो असा अनुभव यवतमाळच्या प्रेरणा ग्रामविकास आणि पुण्याच्या समाजवादी महिला सभेने सांगितला आहे. कोल्हापुरातही अनेक जणींना घरी जागा दिल्याचं कार्यकर्त्यांनी सांगितलं आहे.

एकाहून अधिक लग्नं हा हिंसेचा प्रकार म्हणून मोठ्या प्रमाणावर नोंदवला गेला आहे. अशा केसेसमध्ये लग्न सिद्ध करणं ही मोठी अडचण ठरत असल्याचं कोल्हापूर आणि जळगावमधून पुढे आलं आहे. अशी लग्नं सिद्ध करता येत नसल्यामुळे पुढे पोटगी मिळण्यामध्येही अडचणी येतात. देवदासींमध्ये अनेकदा सूर्याला साक्ष ठेवून लग्नं होतात आणि ती सिद्ध करणं अशक्य असतं. त्यातच बाईची निम्मी शक्ती खर्च होते असं साधना झाडबुके यांनी सांगितलं आहे.

स्त्रियांमधील आत्मविश्वासाचा अभाव आणि अतिसोशीक मानसिकता ही कारणंही काम करताना येणाऱ्या अडचणी म्हणून पुढे आली आहेत. तसंच समाजातील रूढी हा बदलामधला मोठा अडसर ठरत असल्याचं मत सर्वच विभागातल्या कार्यकर्त्यांनी नोंदवल्याचं दिसतं.

ज्या संस्था संघटना महिलांच्या प्रश्नांवर अनेक वर्षं काम करत आहेत त्यांनी स्त्रियांचे प्रश्न, त्यातील बिकट होत जाणारी आव्हानं आणि खासकरुन हिंसेच्या प्रश्नावर काम करताना जाणवत असलेले प्रश्न याबाबत काही विवेचन केलं आहे. प्रत्यक्ष मुलाखतींमधून काही विचार मांडले गेले आहेत तर काही उपलब्ध पुस्तकांमधून घेण्यात आले आहेत.

स्त्री मुक्ती संघटनेनं असं मांडलं आहे की गेल्या काही वर्षांमध्ये एकंदरितच चंगळवादी आणि उपभोगवादी वृत्तींचा विळखा समाजाभोवती पडतो आहे. विशेषत: तरुण पिढीची वृत्ती जास्तीत जास्त स्वकेंद्री होत चालली आहे. समाजाच्या उभारणीत ज्यांचा सहभाग गृहित धरलेला असतो अशा तरुण पिढीने स्थितीवादी वृत्ती बाळगून केवळ व्यक्तिसुखाचा विचार करणे अत्यंत हानिकारक आहे. सर्वच चळवळींपुढे हा मोठा प्रश्न आहे.

राजकारणात स्त्रियांचा सक्रीय सहभाग असावा, असं म्हणत असताना एक वेगळ्या प्रकारचं आव्हान स्त्री-चळवळीला पेलावं लागणार आहे. सद्य:स्थितीतील राजकारण पुरुषी मूल्यांवर चालतं. राजकारणात सक्रीय होताना सत्ताकारणात टिकून राहण्यासाठी स्त्रिया नकळतपणे पुरुषी मूल्यं अंगिकारुन राजकारण करतात. राजकारण हा व्यापक समाजकारणाचा एक भाग आहे, याचं भान स्त्रियांनी जाणीवपूर्वक बाळगणं आवश्यक आहे. म्हणूनच वेगाने बदलणाऱ्या या जगाला डोळसपणे समजून घेणारी आणि व्यापक समाजहितासाठी या बदलांना कवेत घेणारी नवी स्त्री घडवली पाहिजे असं संघटनेला वाटतं.



महाराष्ट्र स्त्री-मुक्ती आंदोलन संपर्क समितीच्या व्यासपीठावर काही काळ एकत्र येण्याचा प्रयत्न आता जसा दुरावलेला दिसतो, तसं एकूणच १९९० नंतर उत्साह, जोम, वेग, एकत्रपणही उतरणीला लागलं आहे असं महिला दक्षता समितीच्या सुधा कुलकर्णी यांना जाणवतं. एकीकडे जगभरच्या चळवळींशी नातं असताना मग इथे वेगवेगळ्या जगांच्या चौकटी का? एकमेकांशी प्रतिसाद कमी होतो आहे का? संघटनांची आत्मतुष्टता अडचणीची ठरते आहे का? भीती वाटते ती संघटनांची आपापली स्वतंत्र बेटं बनताहेत की काय याची. आपल्या बेटापुरता व्यवहार, सीमांतच विचार, वावर राहू लागला आहे असं वाटतं. एखाद्या प्रश्नापुरतं एकत्र येणं घडतं न घडतं. नंतर प्रश्नाच्या बांधिलकीने पाठपुरावा कमी पडतोच. स्वायत्त संघटनांची लवचिकता हे पूर्वीचं वैशिष्ट्य होतं आणि ती कमी मानणाऱ्या संघटनांनी हाही पेच आता लक्षात घ्यायला हवा आहे. एकीकडे वेगवेगळी नवी पीठं, मंच उभे राहतात, तरी सखीभाव जरा दूरच्या दिव्यासारखा कधी कधी वाटतो आहे असं त्या सांगतात.

दुसरा एक पेच दिसतो. स्त्री ही सहानुभूतीची वस्तू नाही, तर ती म्हणजे जितंजागतं माणूस आहे. माणूस म्हणून समान अधिकाराचा मुद्दा मांडताना पुरुषांची बरोबरी ही समानता नव्हे. समानतेची व्याख्या ही नव्हे की, दुसरा घटक वागतो तसं आपण वागावं. जगण्याचा समान अधिकार हा मुद्दा घेऊन आपापल्या क्षेत्रात काम करताना काही संघटनांसमोर आणि मैत्रिणींसमोर आज प्रश्न दिसतो - 'आपण काय फक्त केसवर्कच करत बसायचं का?' आपण फक्त 'सोशल वर्कर' बनून राहू हे भय पोटात असतं. नवी-नवी प्रकरणं घडतच राहतात. त्या

स्त्रिया येतच राहतात. आपण त्यातच खुरटून पडतो आहोत, अशी आशंका सुधा कुलकर्णी यांना वाटते.

अनेक वर्षं संघटना म्हणून काम केल्यानंतर पोलिस किंवा इतर यंत्रणांचा चांगला प्रतिसाद मिळतो. पण स्त्री - चळवळ म्हणून जी शक्ती तयार होणं आवश्यक आहे ती तयार होण्यात अडचणी येत आहेत. दबाव टाकण्यासाठी शक्ती कमी पडते असं कोल्हापूरहून महिला फेडरेशनच्या मेघा पानसरे सांगतात.

महिला संघटना महिलांच्या प्रश्नावर मत मांडते, मोर्चे काढते, परंतु त्याचा तितका प्रभाव पडत नाही. यासाठी स्त्रियांच्या आंदोलनाला पूर्ण महाराष्ट्रातून महिलांनी शक्ती एकवटली पाहिजे असं जळगावच्या जागृत महिला कृती समितीच्या वासंती दिघे यांना वाटतं. तसंच, तरुण मुलींमध्ये पाश्चिमात्यांकडून येणारा व्यक्तिवाद वाढल्याने त्यांना या प्रश्नावर बोलतं करून संघटित करणं ही मोठी आव्हानात्मक गोष्ट आहे असं त्या सांगतात.

समाजवादी जनपरिषद आणि समता विचार प्रसारक संघटनेच्या अ‍ॅड. निशा शिवूरकर यांच्या मते जनतेतील अराजकीय भावना, तसंच समाजाची आत्मकेंद्रित प्रवृत्ती या कामातील प्रमुख अडचणी आहेत. तसंच समाजात एनजीओंचं प्रस्थ वाढत असल्याने संघटित कामाचा जोम कमी पडतो असं त्यांना वाटतं.

गर्भलिंगनिदानाचा मुद्दा आणि त्याबाबतची डॉक्टरांची भूमिका हे मोठं अवघड आव्हान असल्याचं कोल्हापूरच्या अनुराधा गायकवाड यांनी मांडलं आहे. समाजासाठी आम्ही चांगलं काम करतो, मुलगी नकोच असली तर ती काढून टाकली तर बिघडलं कुठे अशी डॉक्टरांची भूमिका असल्याने आता ते मोठं आव्हान आहे असं त्या म्हणतात. हॅलो मेडिकल फौंडेशनच्या मते कर्नाटक आणि आंध्र प्रदेशामध्ये गर्भलिंगनिदानविरोधी कायदे शिथिल असल्याने लोक तिथे सहजपणे तपासणी करून येतात. या विषयावर काम करताना हा मोठाच अडसर असल्याचं त्यांनी सागितलं आहे.

एक मोठं आव्हान म्हणून पुढे आलेली एक बाब म्हणजे राजकारण किंवा राजकारणी लोकांचा हस्तक्षेप. पुणे व सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यात चेतना महिला विकास संस्था काम करते. या संस्थेच्या अ‍ॅड. असुंता पारधे यांना राजकारणी लोकांचा अडसर मोठा असल्याचं जाणवतं. तसंच अखिल जनवादी संघटनेच्या कार्यकर्त्या सरस्वती भांदिर्गे यांनाही राजकारण ही अडचण वाटते. राजकारण्यांच्या मताप्रमाणे धोरणं बदलतात तसंच अधिकारी बदलतो त्याप्रमाणे कार्यक्रम बदलतात, आणि सामाजिक कार्यकर्त्यांना त्याचा त्रास होतो असा अनुभव विदर्भातूनही पुढे आला आहे. खासकरून वेश्याव्यवसायातील स्त्रियांबाबत सरकारी पातळीवर उदासीनता दिसून येत असल्यामुळे धोरणांचा अडसर निर्माण होतो अशी अडचण यवतमाळमधून ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टने नोंदवली आहे. समाज कल्याण खात्याने जिल्ह्यात वेश्याव्यवसायातील स्त्रियांची संख्या निरंक दाखवली आहे त्यामुळे त्यांच्यासाठी कोणत्याच योजना राबवता येत नाहीत असं उदाहरण त्यांनी यासंदर्भानि नोंदवलं आहे.


गावात पाटलाची मक्तेदारी असल्याने पाटलाने मारल्यावर त्याच्याविरूद्ध तक्रार देणं अवघड होतं अशी अडचण मानवी हक्क अभियानाने मांडली आहे तर मोठ्या राजकारण्यांच्या घरातील सुनांवरील दबाव प्रचंड असूनही काही करता येत नाही हा अनुभव आहे जळगावच्या वासंती दिघे यांचा. आपल्या वॉर्डात एखादी

हिंसेची घटना घडली तर त्यात चुकीच्या पद्धतीने नगरसेवक किंवा इतर राजकारणी ढवळाढवळ करत असल्याचं कोकणातून आणि जळगावातून समोर आलं आहे. आणि त्यांना कसा मुकाबला करायचा हा प्रश्नच आहे असं तिथल्या कार्यकर्त्यांनी मांडलं आहे.

स्त्रियांवरील हिंसेसंबंधी काम करणाऱ्या संस्था-संघटनांचे हे प्रातिनिधिक अनुभव आहेत. त्यामधून हिंसेच्या प्रश्नासंबंधी आणि त्याविरोधात काम करताना येणाऱ्या अडचणी आणि आव्हानांचा मागोवा घेण्यात आला आहे. पुढील काळात या विषयावर काम करताना, त्याचा नव्याने विचार करताना या माहितीचा, सूचनांचा निश्चितच उपयोग होईल.

## महाराष्ट्रातील गुन्हे - २००८: एक झलक

सोबत दिलेली आकृती महाराष्ट्रातील गुन्हे २००८ या अहवालातील टेबल ५.१ च्या आधारावर तयार करण्यात आली आहे. राज्यभरातील पोलिस स्थानकांमध्ये नोंदवलेल्या तक्रारींच्या आधारावर हा अहवाल तयार केला जातो. या नोंदींनुसार स्त्रियांविरोधातील गुन्हे याअंतर्गत राज्यामध्ये जालना जिल्ह्यात अशा गुन्ह्यांचा दर (दर लाख लोकसंख्येमागे गुन्ह्याचं प्रमाण) सर्वात जास्त आहे. नांदेडमध्ये हुंड्यासाठी खुनाचे सर्वात जास्त गुन्हे नोंदवले गेले आहेत (२३). तरी हिंसेचा दर जालन्यात सर्वाधिक आहे. याच जिल्ह्यात पती व नातेवाईकांकडून छळाच्या सर्वात जास्त तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्याखालोखाल बीड व परभणीमध्ये अशा तक्रारी जास्त आहेत.




राज्यातील गुन्हे, २००८, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे

हुंड्यासाठी छळ (थेट खून नव्हे) या प्रकारात प्रत्यक्ष घटना आणि दर यामध्ये अहमदनगरमध्ये सर्वात जास्त गुन्हे नोंदवले गेले आहेत. विनयभंगाचे सर्वाधिक गुन्हे मुंबई आयुक्तालयाच्या कक्षेत घडले असले तरी गुन्ह्याचा दर वर्ध्यामध्ये सर्वात जास्त आहे. चंद्रपूरमध्ये छेडछाडीच्या सर्वाधिक केसेस (१४६) नोंदवल्या गेल्या आहेत. आणि या गुन्ह्याचा दरही तिथे सर्वाधिक आहे.

यवतमाळमध्ये आत्महत्येला प्रवृत्त केल्याचे ९० गुन्हे नोंदवले गेले आहेत तर वर्ध्यामध्ये गुन्ह्याचा दर सर्वाधिक (४) आहे. त्यापाठोपाठ हिंगोली (२.७) आहे.

ही सर्व आकडेवारी विचार करायला लावणारी आहे. स्त्रियांच्या आत्महत्यांमध्ये एकट्या विधवा, परित्यक्तांची संख्या किती आहे? काही भागात गुन्ह्याची नोंद जास्त आणि काही भागात कमी असं चित्र का आहे? गुन्ह्याच्या जास्त नोंदींचा संबंध केवळ घडणाऱ्या हिंसेशी आहे का जास्त शिक्षण आणि जाणीवजागृतीशी देखील आहे? हे सर्व खोलात जाऊन पाहण्याची गरज या आकडेवारीतून पुढे येते.

## निष्कर्ष

महाराष्ट्रातल्या महिलांवरील हिंसेबाबतचं वास्तव समजून घेताना काही गोष्टी प्रकर्षानं पुढे आल्या. बहुतांश कार्यकर्त्यांच्या सांगण्यातून समोर आलेली पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे महिलांवरच्या शारीरिक हिंसेत, छळात तर वाढ होतेच आहे पण दिसून न येणाऱ्या अप्रत्यक्ष अशा हिंसेचं - मानसिक छळाचं प्रमाण वाढल्याचंही दिसून येत आहे. शिवीगाळ करणं, माहेरच्या लोकांचा उद्धार करणं, चारित्र्यावर संशय घेणं इथपासून ते बाईला वेडी ठरवण्यापर्यंतचे नानाविध प्रकार या मानसिक छळात अंतर्भूत आहेत. दुसरीकडे, आणखी एक लक्षात येण्याजोगा बदल दिसून येत आहे. तो म्हणजे छळ सहन न करणाऱ्या, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत केस दाखल करणाऱ्या आणि मौनातून बाहेर पडणाऱ्या महिलांची संख्याही वाढते आहे. कार्यकर्त्यांच्या निरीक्षणानुसार शिक्षित महिला वर्ग अधिक प्रमाणात हिंसेच्या विरोधात बोलू लागला आहे.

केसेस दाखल होण्याचं प्रमाण का वाढतं आहे, याविषयी जाणीवपूर्वक अभ्यास होण्याची गरज आहे. पण हिंसेच्या घटनाच मुळात वाढत आहेत की हिंसेविषयी बोलायला हवं याविषयी झालेल्या जागृतीचा हा परिणाम आहे, हे तपासण्याची गरज आहे. शिवाय पोलिस आणि न्यायव्यवस्था यांच्याबाबतचं असमाधानही कार्यकर्त्यांच्या बोलण्यातून अधोरेखित झालं आहे.

आर्थिक बाबींवरून होणारी हिंसा, मालमत्तेवरून, संपत्तीतील हिश्श्यावरून होणारा छळ अशा प्रकरणांतही वाढ झाल्याचं दिसून येत आहे. एकतर्फी प्रेम, लैंगिक शोषण, किशोरवयीन आणि कुमारवयीन मुलींचा लैंगिक छळ याबाबतच्या घटनांतही लक्षणीय वाढ झाली असल्याचं नोंदवण्यात आलं आहे. त्यातही गर्भलिंगनिदानाच्या वाढत्या आलेखाकडेही कार्यकर्त्यांनी निर्देश केला आहे.

आर्थिक तणाव, वाढती स्पर्धा, बेरोजगारी आणि व्यासनाधीनता याही गोष्टींचा महिलांवर होणाऱ्या हिंसेशी संबंध आहे. केवळ घरातच नाही, तर समाजात वावरतानाही स्त्री हिंसेची बळी ठरते आहे आणि या हिंसेला

जातीय, राजकीय आणि आर्थिक कंगोरे आहेत. पण पोलिसांकडे नोंदलेल्या केसेसमधल्या बहुतांश केसेस या कौटुंबिक अत्याचारांच्या आहेत.

आपण कुणाशी लग्न करायचं हे ठरवण्याची किंवा त्याविषयी मत मांडण्याची अनुमतीही बहुतांश मुलींना मिळत नाही. लग्नावरून आणि हुंड्यावरून होणारा छळ आपल्याकडे नवा नाही. त्यातही एकट्या बाईला समाजात कुठलंही स्थान नाही, हे वेगळंच.

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागांतील अनुभवांवरून असं दिसून आलं आहे की महिलांवरील हिंसेला तिथल्या सामाजिक वास्तवाचीही किनार आहे. कोकणात कुमारवयीन मुलींमधल्या गरोदरपणाची प्रकरणं नोंदली गेली आहेत. मराठवाड्यात ऊसतोडणी कामगार महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची प्रकरणं नोंदली गेली आहेत. विदर्भात ब्ल्यू फिल्म्स आणि सेक्स स्कँडल्सची नोंद झाली आहे. या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी होणं आवश्यक आहे.


महिलांवरील हिंसेचा आढावा घेण्याच्या कामी महाराष्ट्रभरातल्या विविध कार्यकर्त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि जीव ओतून आम्हाला माहिती सांगितली. हिंसेमधले बदलते प्रवाह कार्यकर्तेम्हणून अनुभवाला येणारी असहायता, राग आणि वैफल्य त्यांनी त्यांच्या मुलाखतींमधून व्यक्त केलं. तीस-तीस वर्षं या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी आजवर अनेक अत्याचारित महिलांचं समुपदेशन केलं आहे, कोर्ट केसेस लढवल्या आहेत आणि यापुढेही ती मंडळी हे काम करत राहणार आहेत. पण हा आढावा घेताना असं लक्षात आलं आहे की स्त्रियांवरील अत्याचाराबाबत केलं जाणारं काम व्यवसाय म्हणून केलं जाऊ लागलं आहे आणि स्वयंसेवी संस्थांच्या परिघातच फिरत राहिलं आहे. अभियानं राबवली जातात - एखादा प्रकल्प म्हणून, आंतरराष्ट्रीय अभियान दिनांच्या निमित्ताने किंवा देणगीदार संस्थांच्या एखाद्या मोठ्या व्यूहरचनेचा भाग म्हणून.

स्त्रियांवरच्या हिंसेबाबत काम करणाऱ्या काही संस्थांचा दृष्टिकोनच दोषपूर्ण आहे. दुसरीकडे स्त्रियांवरची हिंसा ही मानवी अधिकाराचं उल्लंघन आहे आणि त्यादृष्टीने ते मांडण्याचाही प्रयत्न होतो आहे. पण याही बाबतीत केवळ हिंसेच्या घटनांकडे लक्ष दिलं जातं आणि त्यातील व्यवस्थात्मक प्रश्न (उदा. लग्नपद्धती, हुंडा, एकापेक्षा जास्त लग्नं करणं इत्यादी) चर्चेच्या केंद्रस्थानी आलेले नाहीत. हिंसामुक्त समाज प्रत्यक्षात उतरवण्यासाठी ही चर्चाही महत्त्वाची आहे.

या आढाव्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. ती म्हणजे स्त्रियांवरच्या हिंसेचे पैलू समजून घेण्यासाठी संपूर्ण राज्यभरात काही किमान कालावधीचा सातत्यपूर्ण अभ्यास होण्याची नितांत गरज आहे. अशा अभ्यासातून स्थानिक पातळीवर प्रभावी मोहिमा आणि व्यूहरचना आखणं शक्य होईल. सामूहिक प्रयत्नांची गरज कायमच अधोरेखित केली गेली आहे.

## १. मराठवाडा

**अनिश्चित पर्जन्यमान, दुष्काळी भाग, मोठे भूधारक आणि काही भागात भूमीहीन.पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानचा भाग. १९६४ साली महाराष्ट्रात सामील.**



साक्षरताः सरासरी ६५, स्त्रीः ५५.४७ टक्के, पुरुष
०-६ लिंग गुणोत्तरः सरासरी ९०९, सर्वात कमी औरंगाबाद (८९०)
५० टक्क्याहून अधिक विवाह १८ वर्षाच्या आत.
१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः ५१.६०
७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः ४७.७५ (१९९९)

**भेटी**
मानवलोक, ता. अंबाजोगाई, जि. बीड
मानवी हक्क अभियान, बीड
सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड
आदर्श महिला गृह उद्योग, लातूर
हॅलो मेडिकल फौंडेशन, अणदूर, जि. उस्मानाबाद

**पत्रातून माहिती**
ग्रामीण विकास मंडळ बनसोराळा संचलित कौटंबिक समुपदेशन केंद्र, बीड
ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान, बुधोडा, जि. लातूर
नारी प्रबोधन मंच, लातूर
समता प्रतिष्ठान, बीड
सत्यदीप महिला मंडळ, जालना
प्रतिज्ञा संस्था, परभणी
जनकल्याण ग्रामीण विकास संस्था, परभणी
सम्राट अशोक प्रतिष्ठान, औरंगाबाद

### हिंसेचे स्वरुपः

मराठवाडा विभागात बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी आणि जालना या भागातील निवडक संस्था–संघटनांची माहिती घेण्यात आली. काही माहिती संस्थांनी पत्रांद्वारे पाठवलेली आहे. दलित हक्कावर काम करणारं मानवी हक्क अभियान, सावित्रीबाई फुले महिला मंडळ, सामाजिक न्याय आंदोलन, भारतवैद्यक आरोग्य कार्यकर्ते तसंच स्त्रियांच्या आरोग्यासंबंधी काम करणारं हॅलो मेडिकल फौंडेशन, गेली ३० वर्षं कार्यरत असणारं मानवलोक आणि आदर्श महिला गृह उद्योग यासारख्या संस्था आणि महिला व मुलांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या इतर संस्थांचा यात समावेश आहे.

मराठवाड्यातील आपल्या कामाच्या आधारे आणि आजूबाजूला घडत असणाऱ्या घटनांच्या आधारे स्त्रियांवरील हिंसेचे काही मुख्य प्रकार पुढे आले आहेत. सर्वात जास्त प्रमाणात घडणाऱ्या प्रकारांपासून सुरुवात केली आहे.

१. मानसिक छळ, संशयावरुन छळ, मारहाण, सोडून देणं
२. अघोरी मारहाण, शारीरिक छळ, क्षुल्लक कारणावरुन मारहाण
३. आत्महत्येस प्रवृत्त करणं
४. दलित स्त्रियांवरील बलात्कार, लैंगिक शोषण, सासरच्या व्यक्तींकडून आणि इतर व्यक्ती; उदा. मुकादमाकडून लैंगिक शोषण

५. हुंडा, हुंड्यासाठी छळ, मारहाण

६. गर्भलिंगनिदान

७. मूल होत नाही किंवा फक्त मुली झाल्या म्हणून छळ, मारहाण, बायकोला सोडून देणं

८. दारु पिऊन छळ, मारहाण

९. परित्यक्ता : बायकोला न नांदवणं, टाकून देणं

१०. लहान वयात लग्न, मजुरीसाठी बाईच्या श्रमांचा वापर

११. पुरुषाला दारु, मटका, जुगाराचं व्यसन

१२. बापाने मुलीला विकणं, पतीने पत्नीला विकणं, देहविक्रयासाठी मुलींना पळवणं

मराठवाड्यातील स्त्रियांवरील हिंसेचा आढावा घेताना तिथली सरंजामी वृत्ती आणि समाजरचना, पुरुषसत्ताक विचारांमुळे बाईवर लादलेली बंधनं आणि दलित स्त्रियांवर जात आणि बाई म्हणून केली जाणारी हिंसा याचा प्रामुख्याने उल्लेख केला गेला. कमी वयात लग्न, कमी शिक्षण आणि वागण्याबोलण्यावर, संचारावर बंधन यातून बाईचं समाजातलं दुय्यम स्थान दिसून आलं. जातीने दलित स्त्रीवर लादलेली बंधनं आणि त्यातून घरात व घराबाहेर होणारं शोषण हे मुद्देही प्रामुख्याने पुढे आले. संशय किंवा इतर कारणावरुन केला जाणारा मानसिक छळ, सर्वमान्य असणारी मारहाण आणि अघोरी शारीरिक मारहाण, दलित स्त्रीचं लैंगिक शोषण हे या विभागातील हिंसेचे प्रमुख प्रकार मानता येतील.

हिंसेचा जास्त आढळणारा प्रकार कोणता? १३ पैकी एकूण ८ संस्थांच्या मते, स्त्रियांचा मानसिक छळ हा मोठ्या प्रमाणावर होतो. शारीरिक हिंसा आणि मारहाण होत असल्याचं पाच संस्था नोंदवतात पण मानसिक छळाचं प्रमाण गेल्या काही काळात वाढल्याचं या आढाव्यादरम्यान सांगितलं गेलं आहे. शिवीगाळ, अपमान करणं, माहेरच्यांविषयी घाणेरडं बोलणं, यासोबतच संशय घेणं हे प्रकार नव्याने दिसत असल्याचं ३ संस्थांनी सांगितलं. संशयी स्वभाव, संशयावरुन मारहाण, अतिशय अघोरी मारहाण, वागण्याबोलण्यावर बंधनं घालणं आणि संशयावरुन बायकोला सोडून देणं हे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचं ३ संस्थांच्या अनुभवातून दिसून येतं.

शारीरिक छळ आणि मारहाणीमध्ये विशेष जाणवणारी गोष्ट म्हणजे अगदी क्षुल्लक कारणावरुनही मारहाण होते. त्यातून भांडण विकोपाला जाऊन अतिशय अघोरी पद्धतीने मारहाणीच्या घटना घडतच असल्याचं आढाव्यातून दिसतं. जेवायला वेळेवर वाढलं नाही, घरात आल्यावर लक्ष दिलं नाही, पाण्याचा ग्लास दिला नाही, अशा बारीकसारीक गोष्टींवरून 'बाईचं चुकलं' या कारणाने भांडणं सुरु होतात आणि नंतर त्याची परिणती मारहाणीत होताना दिसते. कुठल्याही वस्तूने (चौरंग, बसायचा पाट) मारणं, चामडं निघेपर्यंत मारणं, अंगावर गरम पाणी ओतणं, सिगारेटचे चटके देणं, काळंनिळं होईपर्यंत चावे घेणं, डोकं फुटेस्तोवर आपटणं, मारणं हे प्रकार बीड, उस्मानाबादच्या भागात नोंदवले गेले आहेत. लग्न झाल्या झाल्या दोन–तीन महिन्यात अशी मारहाण झाल्याची घटना बीडमध्ये नोंदवली गेली आहे. परंतु इतकी जीवघेणी मारहाण झाल्यावरही 'मुलीला नंतर नांदवणार नाहीत' या भीतीने पालक तक्रार नोंदवत नसल्याचं दिसून येतं. बाई सोडण्याचा, नांदायला न नेण्याचा म्हणजेच परित्यक्ता स्त्रियांचा मोठा प्रश्न मराठवाड्यात असल्याने ही भीती निष्कारण नाही हेही खरंच आहे.

**ऊसतोडीचं काम आणि त्यासाठी ६ महिने मोठ्या प्रमाणावर स्थलांतर हे मराठवाड्याला काही नवीन नाही. खासकरुन बीड, परभणी भागात हे प्रमाण जास्त आहे. मजुरीसाठी जितकी मोठी माणसं जास्त तितकी मुकादमाकडून उचल जास्त मिळते. त्यामुळे तोडीला जाण्याआधी लहान वयातच मुला–मुलींची लग्नं लावली जातात आणि १६–१७ वयातच लग्न करुन जोडपं मजुरीसाठी जातं. अनेकदा मुलगी नवऱ्याबरोबर नांदत नसते पण तोडीच्या सहा महिन्यासाठी तिच्या नावाची उचल मिळते या कारणाने तिला सोबत नेलं जातं आणि परत आल्यावर माहेरी धाडलं जातं. अशा प्रकारे स्त्रियांच्या श्रमाचंही शोषण होताना दिसतं. कमी वयात लग्न, त्यातून आलेली बाळंतपणं आणि एकटीने त्यांचा सांभाळ हा मुलीला मनाविरुद्धच करावा लागतो.**

**(मानवी हक्क अभियान, बीड)**

दलित हक्कांवर काम करणाऱ्या मानवी हक्क अभियान आणि सावित्रीबाई फुले महिला मंडळ यांनी दलित स्त्रियांवरील हिंसेचं सखोल विश्लेषण केलं आहे. यात घरातील आणि घराबाहेरील हिंसेचा समावेश आहे. दलित बाईला अनेक कारणांनी छळ सहन करावा लागतो. यामध्ये मारहाण आणि लैंगिक शोषण हे मोठे प्रकार आहेत. घरच्या गरिबीमुळे दलित बाईला मजुरीसाठी शेतावर किंवा रोजगार हमीच्या कामाला बाहेर पडावंच लागतं. त्या ठिकाणी मुकादम अथवा मालकाकडून लैंगिक शोषण होतं, त्यातही जर ती स्त्री विधवा वा परित्यक्ता असेल किंवा दिसायला सुंदर असेल तर तिचं जास्त शोषण होतं. अडचणीच्या वेळी उचल देणं, गोडीगुलाबीने तिला आपल्या कह्यात घेणं, तरुण मुलींवर वाईट नजर आणि लैंगिक शोषणाच्या घटना सर्रास घडतात असं मानवी हक्क अभियानाने नोंदवलं आहे. गेल्या काही काळात बीड, सोलापूरच्या भागात दलित स्त्रियांना विवस्त्र करुन त्यांची धिंड काढल्याच्या घटना घडल्या आहेत. समाजाकडून तिला मिळणारी वागणूक आणि जणू काही ती सार्वजनिक मालकीची आहे असंच या घटनांचं स्वरुप आहे. घरी सासरा किंवा दिराकडून लैंगिक शोषणाच्याही अनेक घटना घडत असल्याचं मानवी हक्क अभियानाच्या कार्यक्षेत्रात दिसून आलं आहे. National Campaign on Dalit Human Rights च्या Black Paper चा संदर्भ देत मनीषा तोकलेंनी सांगितलं की दर तीन मिनिटाला दलित बाईवर बलात्कार होतो आणि एकूण केसेसपैकी फक्त ३०% केसेसच नोंदवल्या जातात. विधवा, परित्यक्ता किंवा ज्यांना काही आधार नाही अशा स्त्रियांचं शोषण होण्याचं आणि तशी शक्यता असण्याचं प्रमाणही जास्त आहे.

हुंडा आणि हुंड्यासाठी छळाची व्याप्तीही या भागात मोठी असल्याचं मत ४ संस्थांनी नोंदवलं आहे. लग्नातील देणी–घेणी, मानपान, हुंडा आणि लग्न झाल्यावरही पैशाची मागणी सर्वच ठिकाणी आढळते. रिक्षा आणायला, वस्तू आणायला, टीव्ही आणायला माहेरुन पैसे आणण्यासाठी बाईचा छळ होतो. त्यातही घरची तंगाई असेल तर हा छळ वाढत असल्याचं मत आढाव्यात व्यक्त झालं आहे. केवळ हुंड्यासाठीच लग्न करणं आणि नंतर बायकोला सोडून देणं अशीही काही प्रकरणं अणदूर भागात नोंदवली गेल्याचं हॅलो मेडिकलच्या सावली केंद्रातील नोंदी दाखवतात. बायकोच्या नावावरची जमीन स्वतःच्या नावावर करण्यासाठी छळ केल्याच्या घटनांचं मूळही पैसा आणि हुंडा हेच आहे.

'मुली ओझं आहेत' असं वाटण्यामागे हुंडा हे एक मोठं कारण आहे. मुलींना नकोशा' मानणाऱ्या मानसिकतेमुळे आणि मुली झाल्या तर होणारा छळ नको म्हणून 'मुलीच नकोत' असा विचार करणाऱ्यांचं प्रमाण वाढत आहे. गर्भलिंगनिदान आणि मुलगी असेल तर गर्भपात अशा प्रकारची हिंसा जास्त होत असल्याचं मत ३ संस्थांनी नोंदवलं आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात पूर्वी गर्भलिंगनिदानासंबंधी कायदे शिथिल होते. त्यामुळे गुलबर्ग्यासारख्या ठिकाणी सोनोग्राफी आणि मुलगी असेल तर गर्भपाताच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत होत्या.अजूनही हे प्रमाण कमी झालेलं नाही. अनेकदा मुलगी असल्यास गर्भपात करण्यासाठी बाईवर दबाव टाकला जातो हे हॅलोच्या सावली केंद्रातील नोंदींवरुन दिसून येतं. लातूर, बीड, उस्मानाबादमध्ये मुलींची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे, आणि त्यासाठी गर्भलिंगनिदानच कारणीभूत आहे.

कारणीभूत आहे असा बीडमधील मानवी हक्कअभियान आणि सावित्रीबाई फुले महिला मंडळाचाही अनुभव आहे. हॅलोने हे प्रमाण गरिबांपेक्षाही सुशिक्षित आणि श्रीमंतांमध्ये जास्त असल्याचं मत नोंदवलं आहे.

**मुलगी झाल्यावर होणारी हिंसाही क्रूर आहे. एका घटनेत बाईला मुलगी झाल्यावर 'मला मुलगी होऊच शकत नाही, तुझे बाहेर कोणाशी तरी संबंध आहेत' असा आरोप करुन नवऱ्याने बायकोला माहेरीच सोडून दिलं होतं. दीड वर्षांनी जेव्हा ती परत आली आणि तिला दुसऱ्यांदा मुलगीच झाली तेव्हा तिच्यावर रॉकेल ओतण्यात आलं. पेटवून द्यायच्या आत ती पोलिस स्टेशनला पोचली म्हणून तिचा जीव वाचला.**

**(मानवी हक्क अभियान, बीड)**

याच प्रकाराचं वाढतं प्रमाण नोंदवतानाच मुलींकडे पाहण्याचा समाजाचा आणि घरच्यांचा दृष्टीकोन काय आहे हे पाहणं महत्त्वाचं ठरतं. मुलगा होत नाही, केवळ मुलीच होतात या कारणाने होणारी हिंसा जास्त आहे असं २ संस्था नोंदवतात. मथलगी झाली म्हणून छळ करणार किंवा दुसरी बायको करणार याची भीती बायकांच्या मनात आहे. त्यातून नवजात मुलींना दूध न पाजणं, टेन्शनमुळे पुरेसं दूध न येणं, मुलीची नीट निगा न राखणं असेही प्रकार घडत असल्याचं दवाखान्यातल्या किंवा घरातल्याच म्हाताऱ्या बायका सांगतात असं मानवी हक्क अभियानाने सांगितलं आहे. अनेकदा नवजात मुली आजारी पडून दगावल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत.

'बाई टाकणं' हा प्रश्न मराठवाड्यात गंभीर आहे. परित्यक्तांच्या प्रश्नावर काम झालं आहे पण अजूनही बाई टाकणं, नांदवायला न नेणं अशा प्रकारच्या केसेस ४ संस्थांच्या अनुभवातून दिसून येतात. मराठवाड्याच्या बऱ्याच भागात अजूनही गोशा पद्धत आहे. बाईने जास्त बाहेर पडू नये, पदर घेऊनच बाहेर पडावं ही रीत अजूनही ब्राह्मण, मराठ्यांमध्ये आहे. अशा सरंजामी रचनेत एकट्या बाईला किती छळ/त्रास सहन करावा लागतो याची कल्पना करता येते. दुसऱ्या लग्नाला मान्यता नाही त्यामुळे संपूर्ण आयुष्य एकटीने काढावं लागतं. त्यातही एकट्या स्त्रियांचं लैंगिक शोषण होत असल्याच्या घटना नोंदवण्यात आल्या आहेत. संपत्तीत वाटा नाही, जमीन नावावर नाही, मुलांची जबाबदारी या गोष्टी परित्यक्तांच्या प्रश्नाचं गांभीर्य वाढवतात असंही आढळून आलं आहे.


गरिबी आणि बेकारी या संदर्भात स्त्रियांवरील हिंसेचा विचार मानवी हक्क अभियानाच्या विश्लेषणातून डोकावून जातो. घरची परिस्थिती नीट नाही, मजुरी मिळालेली नाही, मालक बोलला, रागावला तर त्याचं सगळं टेन्शन घरच्यांवर निघतं. बाईला मारहाण होते. मारहाण होण्यामागे असं टेन्शन आणि पुरुषी सरंजामी विचार असल्याचं मत संघटनेने नोंदवलं आहे.

आदर्श महिला गृह उद्योग ही संस्था 'सेव अवर सिस्टर्स' या नेटवर्कमध्ये काम करते. लातूर जिल्ह्यामधे त्यांचं काम चालू आहे. या कामादरम्यान बापाने मुलीला विकल्याच्या किंवा पतीने पत्नीलाच विकल्याच्या घटना त्यांच्या पाहण्यात आल्या आहेत. पण बाकी भागांमधून असे काही अनुभव मांडले गेलेले नाहीत.

हिंसेच्या स्वरुपात काही बदल जाणवतो का, याबाबत वेगवेगळी मतं नोंदवली गेली आहेत. ती पुढीलप्रमाणे –

- पूर्वी शारीरिक हिंसा जास्त होती. आता मानसिक छळ जास्त आहे. लैंगिक हिंसा काही अंशी कमी झाली आहे.
- हिंसेच्या स्वरुपात फारसा बदल झालेला नाही. उलट अत्याचाराचं प्रमाण वाढत आहे.
- पूर्वीपेक्षा जागृती वाढल्याने केसेस वाढल्या आहेत.
- राजकारणात सहभागी स्त्रियांवरच्या हिंसेचेही प्रश्न गंभीर आहेत. त्याबाबत वेगळं काम करणं आवश्यक आहे.

# २. विदर्भ



**निश्चित पर्जन्यमान, मोठे भूधारक, मोठ्या संख्येने भूमीहीन. आदिवासींची लोकसंख्या जास्त.**

स्त्री साक्षरताः ६७.१४, गडचिरोली सर्वात कमी ५०.६४
०–६ लिंग गुणोत्तरः सरासरी ९३८, गडचिरोली सर्वात जास्त ९६६
१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः २१.२२
७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः सरासरी ३१.५४ (१९९९)

**भेटी**

प्रेरणा ग्राम विकास संस्था, यवतमाळ
अस्मिता इन्स्टिट्यूट फॉर डेव्हलपमेंट, यवतमाळ
ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, यवतमाळ
प्रकृती महिला संसाधन केंद्र, लोणारा, जि. नागपूर
भारतीय स्त्री शक्ती, नागपूर
स्त्री अत्याचार विरोधी परिषद, नागपूर
रुबी सोशल वेलफेअर सोसायटी, नागपूर
चेतना विकास, वर्धा

**पत्रातून माहिती**

स्वावलंबी बहुद्देशीय पर्यावरण संरक्षण सेवा समिती, चंद्रपूर
दिव्यज्ञान महिला बहुद्देशीय विकास संस्था, अकोला
मिलिंद बहुद्देशीय शिक्षण, क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळ, अकोला
आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा, जि. गडचिरोली

विदर्भातील एकूण १२ संस्थांच्या कामाची माहिती घेण्यात आली. त्यामध्ये ८ संस्थांना भेट देण्यात आली तर ४ संस्थांनी पत्राद्वारे त्यांची माहिती पाठवली. बहुतेक संस्था कौटुंबिक हिंसाचाराबाबत काम करत आहेत. यवतमाळ येथील ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट ही संस्था वेश्याव्यवसायातील स्त्रियांसोबत काम करते.

या विभागात प्रामुख्याने पुढे आलेले हिंसेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

१. कुटुंबातील व्यक्तींकडून शारीरिक हिंसा, मारहाण
२. लैंगिक छळ, बलात्कार
३. मानसिक हिंसा, संशय घेणे
४. नवऱ्याला दारू, जुगार इत्यादीचं व्यसन
५. हुंडा
६. आर्थिक हिंसा – नवरा कमवत नाही, बायकोला मजुरी म्हणून मिळालेल्या पैशावर तिचा हक्क नाही
७. वेश्याव्यवसायातील स्त्रियांवर त्यांचे पार्टनर, समाजातील गुंड, पोलिस व एकूणच समाजाकडून होणार हिंसाचार
८. नालमत्तेवरुन विधवा स्त्रियांना होणार त्रास
९. एकट्या, विधवा, परित्यक्ता स्त्रियांच्या आत्महत्या
१०. नवऱ्याचे बाहेर संबंध
११. गर्भलिंगनिदान व गर्भपात
१२. महिला सरपंचांना विरोध, भर चौकात मारहाण

विदर्भातल्या शहरी, ग्रामीण, आदिवासी भागात, तसंच मुस्लिम स्त्रियांसोबत व वेश्याव्यवसायातील स्त्रियांसोबत काम करणाऱ्या संस्थांनी त्यांचे अनुभव मांडले आहेत. १२ पैकी ८ संस्थांनी शारीरिक हिंसा/मारहाण सर्वात जास्त असल्याचं सांगितलं आहे. मारहाण केल्याची तक्रार केल्यास उलट हिंसेमध्ये जास्त वाढ होत असल्याचा अनुभव आवर्जून मांडण्यात आला आहे. तसंच नव्याने दिसणाऱ्या केसेसमध्ये लोकांना दिसून येणार नाही, रक्त दिसणार नाही, जीव जाणार नाही अशा पद्धतीने अवघड जागी मारहाण होत असल्याचं मत प्रकृती संस्थेने मांडलं आहे. नवऱ्याप्रमाणेच कुटुंबातील इतर व्यक्तींकडूनही होणाऱ्या अत्याचाराचं प्रमाण जास्त असल्याचं मत ३ संस्था नोंदवतात.

शारीरिक मारहाणीपाठोपाठ जास्तीत जास्त आढळणारा हिंसेचा प्रकार आहे लैंगिक छळाचा. यात नवऱ्याकडून शारीरिक संबंधांसाठी छळ आणि बलात्कार याचा उल्लेख ३ संस्थांनी केला आहे. त्याचसोबत किशोरवयीन, अल्पवयीन मुलींवर घरच्यांनी अथवा बाहेरच्यांनी केलेल्या लैंगिक शोषणाचाही उल्लेख आहे. अकोल्याहून आलेल्या माहितीत सेक्स स्कॅण्डलचा उल्लेख आहे पण त्याबद्दल ठोस माहिती नाही. विधवा सुनेचं सासऱ्याकडून लैंगिक शोषण होण्याचे प्रकार नागपूर ग्रामीणमधील प्रकृती व यवतमाळमधील संस्थांनी नोंदवले आहेत.

'टीव्ही/सीडी/ब्ल्यू फिल्म अगदी सहज उपलब्ध आहेत. त्या पाहून तशा प्रकारच्या सेक्सची मागणी नवरे करतात आणि बायकांवर हिंसा करतात किंवा बाहेर जाऊन तसे संबंध ठेवण्याची धमकी देतात, तशी त्यांची तयारी आहे' हा अनुभव नागपुरात आणि यवतमाळमध्ये नोंदवला गेला आहे. दुसरीकडे या फिल्म्स पाहून किशोरवयीन मुलींवरील अत्याचार वाढल्याचं अकोला भागात दिसून आलं आहे.

मारझोड, जाळणं, शारीरिक छळाप्रमाणेच मानसिक हिंसा आणि छळाचं प्रमाणही वाढत आहे असं मत ५ संस्था नोंदवतात. या संदर्भाने अपमानास्पद बोलणं, खोटंनाटं बोलत आत्महत्येस प्रवृत्त करणं, वेडं ठरवण्याचा प्रयत्न करणं अशा काही केसेस नोंदवल्या गेल्या आहेत. मारहाण अजूनही होतेच ती काही कमी झालेली नाही पण न दिसणारी, इतरांना न कळू शकणारी मानसिक हिंसा वाढली असल्याचं मत या संस्थांनी नोंदवलं आहे. मुद्दाम दारु पिऊन बायकोच्या घरी जाऊन तमाशा करणं, वाईटसाईट बोलणं, काही बोलल्यास मारहाण करणं या पद्धतीनेही जाणूनबुजून मानसिक छळ केला जात आहे.

मानसिक छळाचंच एक स्वरूप आहे ते म्हणजे चारित्र्यावरुन संशय घेणं व त्यावरुन त्रास देणं, मारहाण करणं. नागपुरात गेली अनेक दशकं या विषयावर काम करणाऱ्या सीमा साखरेंच्या मते संशयाचं प्रमाण वाढू लागलं आहे. असंच मत इतर ५ संस्था नोंदवतात. पूर्वी बायका घराबाहेर पडत नसत. पण आता शिक्षणासाठी, मजुरीसाठी, नोकरी–व्यवसायासाठी त्या बाहेर जाऊ लागल्या आहेत. याचा परिणाम म्हणून 'तू याच्याशी का बोलली, त्याच्याकडे का पाहिलं' असा संशय घेऊन तिच्यावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न नवऱ्याकडून केला जात आहे. बाईवर नियंत्रण ठेवण्याचा, तिचा मानसिक छळ करण्याचाच हा प्रकार आहे.

विविध जिल्ह्यांमधून अशीच परिस्थिती दिसत आहे. यवतमाळच्या संगीता गायकवाड सांगतात की खासकरुन ज्या स्त्रिया बचत गटासारख्या माध्यमातून जरा बाहेर पडतात, पुढे जाऊ लागतात, त्यांच्याबाबतीत हा प्रकार जास्त घडून येतो. त्यांच्या चारित्र्यावर घरचे आणि दारचेही संशय घेतात आणि त्यांचं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करतात.

पुरुषांमधील दारु आणि/किंवा जुगाराचं व्यसन हाही प्रकार एकूण ६ संस्थांनी नोंदवला आहे. नागपुरातील मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या रुबी सोशल वेलफेअर संस्थेने असं मत मांडलं आहे की वस्तीतील प्रत्येक घरात पुरुषाला दारु अथवा जुगाराचं व्यसन आहे आणि त्यामुळे स्त्रियांवर प्रचंड प्रमाणात हिंसा होत आहे. विदर्भातल्या इतर भागांमधूनही असाच अनुभव पुढे आला आहे.

यानंतर जास्त दिसणारे हिंसेचे प्रकार म्हणजे हुंडा आणि आर्थिक बाबींशी निगडित हिंसा. हे प्रकार जास्त असल्याचं मत ३ संस्था नोंदवतात. आर्थिक हिंसेमध्ये मुख्यतः नवऱ्याने स्वतः न कमवता घरी बसून राहणं, बायकोचा पगार हिसकावून घेणं हे प्रकार आले आहेत. यवतमाळच्या आदिवासी भागात कोलाम, पारधी समाजात स्त्रियाच शेतात मजुरीला जातात, पुरुष काही कामधंदा करत नाहीत. पण बाईला तिच्या पैशावर कसलाही हक्क नाही, अशा घटना आढाव्यातून पुढे आल्या आहेत.

आर्थिक बाबींप्रमाणेच संपत्तीतील हिश्श्याचा उल्लेखही २ संस्था करतात. यवतमाळ आणि नागपूर ग्रामीणमध्ये विधवा स्त्रियांना संपत्तीत वाटा नसल्याने किंवा त्यांच्या नावे असलेल्या प्रॉपर्टीवरुन मुलांकडून हिंसा सहन करावी लागते असे अनुभव आहेत. यवतमाळातील २ संस्थांच्या मते विधवा, एकट्या स्त्रियांना कसलीच आधारयंत्रणा नसल्याने आत्महत्यांचं प्रमाणही जास्त आहे. बाई परत माहेरी आली तर तिथेही तिला थारा मिळत नाही, मग ती परत सासरी जाते आणि जाच सहन करत राहते असा अनुभव नागपुरातील भारतीय स्त्री शक्तीच्या समुपदेशक नोंदवतात. घरच्या प्रॉपर्टीत हिस्सा द्यावा लागू नये म्हणून ६/६ वर्षं वेगळं राहत असूनही नवरा घटस्फोट द्यायला तयार नाही अशा घटनांमधून प्रॉपर्टी आणि स्त्रियांवरील हिंसेचा संबंध दिसून येतो.

(टीपः शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत असताना विधवांचा प्रश्न मोठाच आहे. या विधवांना जमिनीत, संपत्तीत वाटा मिळत नसेल आणि त्यांनाही जर आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागत असेल तर त्याचं गांभीर्य समजून घ्यायला हवं.)

स्त्रियांवरील हिंसेचा आढावा घेताना वेश्याव्यवसायातील स्त्रियांचे प्रश्न गंभीर असल्याचं मत यवतमाळच्या ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट या संस्थेने नोंदवलं आहे. वेश्याव्यवसायातील स्त्रियांवरील हिंसेचे विविध प्रकार त्यांनी सांगितले आहेत. यामध्ये वेश्या स्त्रियांना त्यांच्या पार्टनरकडून होणारी मारहाण, पैसे उकळण्यासाठी पोलिसांकडून होणारा छळ, विनाकारण कस्टडीत ठेवणं हे प्रकार सांगितले आहेत. पण त्यासोबतच संपूर्ण वेश्यावस्तीच जाळून टाकण्याचा अतिशय हिंसक प्रकारही यवतमाळमध्ये झाला आहे हेही इथे नमूद करायला हवं.

विदर्भात इतर भागांच्या तुलनेत अजून तरी गर्भलिंगनिदानाचं प्रमाण वाढलेलं नाही. त्यामुळे दोनच संस्थांनी अशा प्रकारच्या हिंसेचा उल्लेख केला आहे. आणि ही चांगलीच बाब मानायला हवी. एकूण स्त्रीने कसं वागावं, पुरुषाच्या मनाप्रमाणेच वागावं, पुरुष हा स्त्रीहून श्रेष्ठ आहे ही विचारसरणीच पहिली हिंसा आहे आणि ती प्रत्येक घरात, संपूर्ण समाजातच होताना दिसते असं मत सीमा साखरे व इतरही संस्था नोंदवतात.

सुनेवरचं नियंत्रण, बंधन यामुळे तिचे स्वतंत्र व्यक्ती म्हणून असणारे अधिकार हिरावून घेतले जातात. बायकोने माझ्या

**वेश्या व्यवसायातील स्त्रियांची १२-१५ घरंच जाळून टाकण्यात आली. इतर वेश्यावस्तींमध्ये घरं स्त्रियांच्या स्वतःच्या नावावर आहेत पण यवतमाळमधील सर्व वेश्यावस्त्या अतिक्रमण जागेवरच्या आहेत आणि त्यामुळे त्यांना त्या जागेवर किंवा घरावर हक्क नाही. ३०-३५ स्त्रिया या प्रकारामुळे बेघर झाल्या आहेत. त्यांना वेगळी जागा देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता पण त्यांना तीव्र विरोध करत ग्रामपंचायतीने या स्त्रियांना गावाच्या हद्दीत जागा देण्यात येऊ नये असा ठराव मंजूर करुन घेतला. शासन दरबारी यवतमाळात एकही वेश्याव्यवसाय करणारी स्त्री नसल्याची नोंद आहे त्यामुळे कसल्याच योजना किंवा कार्यक्रमांचा लाभ त्या घेऊ शकत नाहीत. हाही त्यांच्यावरील शोषणाचा एक पैलू आहे.**

**(ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, यवतमाळ)**

मनाप्रमाणेच वागावं, मला जेव्हा हवी आणि जितकी हवी तितकी मुलं व्हायला पाहिजे, मी सांगितलं तर कुठलंच गर्भनिरोधक वापरायची गरज नाही अशी पुरुषसत्ताक मानसिकता हा मोठ्या प्रमाणावर 'हिंसेचा प्रकार' म्हणून नमूद करण्यात आला आहे.

गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि बेरोजगारी यापायी पैसा नाही आणि यामुळेही घरांमध्ये बाईवर हिंसा होते असं मत नागपुरातील रुबिना पटेल आणि सीमा साखरे व्यक्त करतात.

जसजशी समाजात स्पर्धा वाढते आहे तसतसा पुरुषावरचा ताणही वाढतो आहे. त्याच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत मग त्याचा राग बायको-मुलांवर निघतो असं विश्लेषण सीमा साखरे यांनी केलं आहे. हिंसा होत आहे पण त्यातून बाहेर पडण्याची हिंमत अजून स्त्रियांमध्ये नाही आणि म्हणून त्या वर्षानुवर्षं अशी हिंसा सहन करत राहतात असा अनुभव भारतीय स्त्री शक्तीच्या समुपदेशक मांडतात. क्षुल्लक कारणांवरुन (उदा. शॅम्पू/तेल जास्त वापरते म्हणून) बायकोला सोडून देण्याच्या घटना आजही इथे-तिथे घडतात असा अनुभव यवतमाळमधून पुढे आला आहे.

हिंसेच्या स्वरुपात काय बदल झाले आहेत, याबाबत वेगवेगळी मतं नोंदवण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

- महिलांवरील अत्याचाराचं प्रमाण काही अंशी कमी झालं आहे पण किशोरवयीन आणि अल्पवयीन मुलींवरच्या हिंसेचं प्रमाण वाढत आहे.
- शारीरिक, उघड दिसणाऱ्या हिंसेपेक्षाही न दिसणारा मानसिक छळ आणि हिंसा वाढत आहे.
- टीव्ही/सीडी/ब्ल्यू फिल्मच्या प्रसारामुळे किशोरवयीन मुलींचं लैंगिक शोषण वाढत आहे.
- छोठ्या-मोठ्या स्वरुपात हिंसा करण्यापेक्षा मारूनच टाकणं, संपवून टाकणं अशी मानसिकता वाढत आहे.
- सामूहिक हिंसा, शिक्षित लोकांमध्ये हिंसेचं वाढतं प्रमाण.
- महिला सरपंचांना अगदी भर चौकात मारहाण, जाळण्याची धमकी देण्याइतपत मजल.

**'आता बायकांमध्ये जागृती वाढत आहे आणि हिंसेचा प्रतिकार करण्याची वृत्ती वाढत आहे. त्यामुळे आपल्यावरच्या हिंसेच्या केसेस बायका जास्त नोंदवत आहेत. अर्थातच 'त्या बोलायला लागल्या म्हणून' त्यांना होणारी मारहाणही वाढत आहे. पूर्वी शेतावर, कामाच्या ठिकाणी पाटलाकडून, पाटलाच्या मुलाकडून होणारं शोषण आता कमी होत आहे. त्याबद्दल बाया सावध झाल्या आहेत.'** - असा अनुभव संगीता गायकवाड यांनी मांडला आहे.

## ३. दक्षिण महाराष्ट्र

स्त्री साक्षरताः ६५.२६
०–६ लिंग गुणोत्तरः सरासरी ८६५
१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः २६.९२
७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः सरासरी २६.५
(१९९९)

**भेटी**
महिला फेडरेशन, कोल्हापूर
विशाखा कृती समिती, कोल्हापूर
दिलासा सामाजिक संस्था, कोल्हापूर
अनगोळ फौंडेशन, कोल्हापूर
दलित महिला विकास मंडळ, सातारा
भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, सांगली



दक्षिण महाराष्ट्रात प्रामुख्याने कोल्हापूर विभागातील माहिती जास्त प्रमाणावर गोळा झाली. सांगली आणि साताऱ्यातील प्रत्येकी एका संस्थेच्या कामाचा अनुभव पाहणीत समाविष्ट आहे.

त्यातून समोर आलेले हिंसेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

१. शारीरिक मारहाण
२. मानसिक छळ; उदा. टाकून, टोचून बोलणं, माहेरच्यांचा सतत उद्धार करणं
३. संशय घेणं; उदा. कुठे गेली, कोणासोबत बोलली असं सतत लक्ष ठेवणं
४. गर्भलिंगनिदान
५. लैंगिक छळ
६. स्वतःच्या मर्जीने लग्न न करु देणं
७. आंतरजातीय–आंतरधर्मीय लग्नांना विरोध, घरच्यांकडून दबाव
८. परित्यक्ता व विधवांना संपत्तीत वाटा न देणं, त्यासाठी त्यांचा छळ करणं
९. बाईला टाकणं
१०. विधवा स्त्रियांचं लैंगिक शोषण, हिंसा
११. एकापेक्षा जास्त बायका करणं
१२. हुंडा, हुंडाबळी, लग्नामध्ये देण्या–घेण्यावरुन छळ
१३. आत्महत्या
१४. मुलींचं जबरदस्तीने लैंगिक शोषण करुन त्याचं मोबाईल अथवा छुप्या कॅमेऱ्यातून शूटिंग करणं, अशा क्लिप्सचा प्रसार करणं

१५. एकतर्फी प्रेमातून खून

१६. आर्थिक हिंसा – नवऱ्याने घरात पैसे न देणं, बायको कमवत असेल तर तिचा पगार वापरणं

१७. दारु पिऊन मारहाण

१८. देवदासी प्रथेमुळे गावाकडून होणारं लैंगिक शोषण

१९. तमाशातील स्त्रियांचं लैंगिक शोषण

२०. एड्सग्रस्त विधवा स्त्रियांना घरातून बाहेर हाकलणं

कोल्हापूर विभागामधील सर्वच संस्थांनी सांगितल्याप्रमाणे हिंसेचं स्वरुप शारीरिक, मानसिक, लैंगिक आणि आर्थिक आहे. शारीरिक हिंसेचं प्रमाण जास्त असल्याचं ४ संस्था सांगतात. पण तितक्याच प्रमाणात मानसिक छळ आणि संशयावरुन छळाचं प्रमाण असल्याचं मत व्यक्त झालं आहे. मानसिक छळामध्ये टाकून बोलणं, टोचून बोलणं, माहेरच्या लोकांचा उद्धार करणं जेणेकरुन त्या बाईचं खच्चीकरण होईल, ती दुखावेल हे प्रकार दिसतात. संशयावरुन मारहाण, छळ हा प्रकारही प्रामुख्याने सांगितला गेला आहे. तू कोणाशी बोललीस, का बोललीस अशा पद्धतीने छळ करुन प्रत्यक्षपणे संशय घेतला जातो. जाणून बुजून, पण अप्रत्यक्षपणे दुसऱ्याच्या नावाने स्वतः मोबाईलवर मेसेजेस पाठवणं आणि मग त्याआधारे बायकोवर संशय घेणं अशाही केसेस घडताना दिसतात. बायकोचं वागणं आवडत नाही, असंच का वागते, तिचं चुकतं अशा कारणांवरुनही मारहाणीचं प्रमाण वाढल्याचा अनुभव सांगलीत आला आहे.

कोल्हापूरमधील २ संस्थांच्या मते हुंडा, हुंड्यासाठी छळ आणि हुंडाबळीचं प्रमाण या भागात खूप जास्त आहे. तसंच आत्महत्यांचं प्रमाणही जास्त आहे. साताऱ्यात मात्र आता याचं प्रमाण कमी झालं आहे असं साताऱ्याच्या ॲड. वर्षा देशपांडे यांनी मांडलं आहे. पण नव्याने दिसून येणारी हिंसा म्हणजे मुलींना स्वतःच्या मर्जीने लग्न न करु देणं. २ संस्थांनी सांगितलेल्या अनुभवांवरुन असं दिसतं की मुलीने स्वतःच्या मर्जीने लग्न ठरवल्यास घरच्यांकडून इमोशनल ब्लॅकमेलिंग, मारहाण अशा केसेस वाढत आहेत. त्यातही आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय लग्न असेल तर मारहाण आणि भावांनी जाऊन संबंधित मुलीचा आणि तिच्या नवऱ्याचा खून केल्याच्या घटना घडताना दिसत आहेत. अशा केसेसच्या अनुभवातून महिला फेडरेशनने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह सहायता केंद्र सुरु केलं आहे आणि आतापर्यंत असे ३५ विवाह करुन दिले आहेत. स्वतःच्या इच्छेनुसार लग्न करायचं आहे, त्याची संधी त्यांना मिळत नाही म्हणून मुली पळून जातात अशाही अनेक केसेस आढळून येत आहेत.

काही गुजराती कुटुंबातील ज्या मुलींनी घरच्यांच्या मर्जीविरोधात जाऊन लग्न केलं आहे अशा मुलींवर घटस्फोट देण्यासाठी दबाव टाकला जातो. काही हिंदुत्त्ववादी संघटनांचे लोक त्यांना तोपर्यंत गुजरातेत नेऊन डांबून ठेवतात अशी माहिती देणाऱ्या काही बातम्या आणि एका मुलीची कहाणी वाचनात येते. अनेकदा यात आई–वडिलांचाही हात असतो. पण अशा केसेसचं रेकॉर्ड नाही. मुली पळून जाण्याच्या अनेक घटना नोंदवल्या जातात हे मात्र स्पष्ट दिसतं. (मुली पळून जातात, मिसिंगची केस होते, नंतर मुलगी एक–दीड वर्षाने परत येते, 'त्या मुलाबरोबर रहायचं नाही' म्हणते, केस मागे घेतली जाते. पण त्यातल्या किती जणींनी आई–वडिलांच्या इच्छेविरुद्ध लग्न केलं होतं याबाबतचं रेकॉर्ड उपलब्ध नाही.)

एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले आणि खून हाही वाढता प्रकार असल्याचं २ संस्थांनी सांगितलं. तसंच शाळा अथवा

कॉलेजच्या मुलींना लॉजवर नेऊन त्यांच्याशी जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवणं, त्याच्या व्हिडिओ क्लिप्स करणं, किंवा मोबाइल अथवा छुप्या कॅमेऱ्यांमधून शूटिंग करुन ते वितरित करणं असेही प्रकार होताना दिसतात.

या विभागातील ३ संस्थांनी गर्भलिंगनिदान हा हिंसेचा मोठा प्रकार असल्याचं सांगितलं. अगदी छोट्या छोट्या वस्त्या-गावांपर्यंत सोनोग्राफीचं तंत्रज्ञान आणि डॉक्टर उपलब्ध असणं आणि मुळातच मुलीची असुरक्षितता आणि मुली नको आहेत ही मानसिकता, यापायी लोक पैसे द्यायला तयार आहेत आणि डॉक्टर पैसे कमवायला तयार आहेत अशी परिस्थिती दिसते. यातून विचार करता येणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात या भागात गर्भलिंगनिदान आणि गर्भपात होत आहेत. कोल्हापूर हा बऱ्यापैकी संपन्न भाग आहे, शेती-वाडी चांगली आहे त्यामुळे इस्टेटीला वारस मुलगाच हवा या विचारसरणीमुळेही मुलींची संख्या झपाट्याने कमी होत आहे असं मत व्यक्त केलं गेलं आहे.

या विचारसरणीमागे कोल्हापूरला जी सरंजामशाहीची परंपरा आहे ती कारणीभूत असल्याचं मत २ संस्थांनी व्यक्त केलं आहे. बाई ही पुरुषापेक्षा कमी आहे आणि त्यामुळे तिने ठराविक चौकटीत रहायला पाहिजे अशा विचाराची पकड समाजमनावर आहे. त्यातूनच दोन किंवा अधिक बायका करणं आणि बाई टाकणं (परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्न) हे मोठ्या प्रमाणावर घडतं. अनेकदा मूल होत नाही या कारणासाठी दुसरं लग्न केलं जातं आणि त्यासाठी पहिल्या बायकोची स्टँप पेपरवर संमती घेतली जाते. पण कायद्याने त्याला काहीच मूल्य नाही. त्यामुळे दुसऱ्या बायकोचे अधिकार नाकारले जाण्याच्याही बऱ्याच केसेस घडत आहेत. कमी वयात लग्न आणि मारहाण हीदेखील दुसऱ्या विवाहाची कारणं आहेत असं मत दिलासा संस्थेच्या रुपा शहा यांनी मांडलं आहे.

लग्नाची नोंद नाही, त्यामुळे पोटगीसारखे कुठलेच अधिकार नाहीत अशा स्त्रियांना लग्न झालं आहे असं कोर्टात सिद्ध करायला लागणं आणि सिद्ध करता न आल्यास काहीच अधिकार न मिळणं हीदेखील मोठी हिंसाच असल्याचं मत व्यक्त करण्यात आलं आहे.

परित्यक्ता स्त्रियांचा प्रश्नही या विभागात गंभीर आहे. लग्न झाल्यावर सुरुवातीला मुलगी सांगत असते त्रास आहे म्हणून! पण दिल्या घरी राहायला हवं अशा मानसिकतेमुळे त्याकडे गांभीर्याने पाहिलं जात नाही आणि मग मुली आत्महत्या करतात, त्यांना मारुन टाकलं जातं किंवा त्या माघारी येतात. नवरा नीट वागवत नाही म्हणून त्या माहेरीच राहतात. दुसऱ्या लग्नाची रीत नाही म्हणून त्या तसंच आयुष्य काढतात, असाही हिंसेचा प्रकार सांगितला गेला आहे.

सरंजामी वृत्ती आणि इस्टेट यामुळे विधवा बाईला संपत्तीत वाटा न देणं व तिने घर सोडून जावं म्हणून तिचा प्रचंड छळ करणं असाही हिंसेचा प्रकार इथे दिसतो. सासरच्या व्यक्तींकडून विधवा स्त्रियांच्या लैंगिक शोषणाच्या बऱ्याच घटना घडत असल्याचं आढळतं.

त्यातही एड्स झालेल्या विधवा स्त्रियांचा प्रश्न गंभीर आहे, असं मत एका संस्थेनं नोंदवलं आहे. नवरा एड्समुळे गेला असल्यास त्यासाठी बाईला जबाबदार धरणं, तिचा छळ करणं आणि घरातून बाहेर हाकलणं अशा केसेस मोठ्या प्रमाणावर घडत आहेत असं साधना झाडबुके सांगतात. देवदासी प्रथा कोल्हापूर विभागात मोठ्या प्रमाणावर आहे. देवदासी स्त्रियांचं लैंगिक शोषण, तमाशातील स्त्रियांचं लैंगिक शोषण असेही प्रकार त्यांनी नोंदवले आहेत.

तृतीयपंथीय (जे पुरुष म्हणून जन्माला आले आहेत पण स्त्री म्हणून राहत आहेत) त्यांच्यावर समाजाकडून मारहाण होते, हिंसा होते असेही प्रकार आढळत असल्याचं साधना झाडबुकेंचं म्हणणं आहे. त्यांनी सांगितलेला एक प्रकार म्हणजे समलिंगी मुलींचे प्रश्न. त्यांच्याकडे अशा दोनच केसेस आल्या असल्या तरी असे काही प्रकार घडताना दिसतात असं त्या सांगतात.

पूर्वी शारीरिक मारहाण जास्त होत असे पण आता कुठल्याही कारणांवरुन (उदा. बायको आवडेनाशी झाली म्हणून) बायकोला टाकणं हा प्रकार वाढीला लागल्याचं रुपा शहा सांगतात. लवकर लग्न होतं, मुलं होतात आणि मग बायकोला सोडून दुसरं लग्न केलं जातं.

नवऱ्याने घरी पैसे न देणं, बायको नोकरी करत असेल तर तिचा पगार वापरणं, इस्टेटीत विशेषकरुन विधवा स्त्रियांना वाटा न देणं अशा स्वरुपाची आर्थिक हिंसा होत असल्याचंही या विभागात दिसलं आहे. २ संस्थांनी हे प्रकार नोंदवले आहेत.

कोल्हापूरच्या एका संस्थेने मात्र स्त्रियांवरील हिंसेप्रमाणेच पुरुषांवरील हिंसेचंही प्रमाण तितकंच असल्याचं सांगितलं आहे. पोटगीच्या केसेस तसंच ४९८च्या केसेस कधी कधी चुकीच्या पद्धतीने लावल्या जातात असाही अनुभव त्यांनी मांडला आहे.

हिंसेच्या स्वरुपात झालेले बदल या विभागात पुढीलप्रमाणे नोंदवले गेले आहेत–

पंचवीसेक वर्षांपूर्वी शारीरिक मारहाण किंवा जाळणं–भाजणं हे प्रकार जास्त होत होते. पण आता मानसिक, लैंगिक आणि इतर प्रकारची हिंसा होत असल्याचं मत नोंदवण्यात आलं आहे. मारहाण अजूनही होत आहे, मुली अजूनही भाजून मरतात पण काही नवे प्रकार पहायला मिळत आहेत असं मत कोल्हापूरमध्ये नोंदवलं गेलं आहे. ते असे–

- बाईला टाकणं. मारहाण आणि शारीरिक हिंसेच्या तुलनेत हे प्रमाण वाढलं आहे.
- स्वतःच्या इच्छेने लग्न न करु देणं.
- गर्भलिंगनिदान आणि स्त्रीलिंगी गर्भपात, नवजात मुलींची हत्या.
- मानसिक त्रास, शारीरिक हिंसेचं प्रमाण थोडं कमी होऊन आता मानसिक जाच–त्रासाचं प्रमाण वाढत आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तिच्या चारित्र्यावर संशय घेणं, त्यासाठी कुठल्याही मार्गांचा वापर करणं असे प्रकार यात दिसत आहेत.
- एकतर्फी प्रेमातून हल्ले, खून. मुलगी नाही म्हणते हे मान्य करण्याची वृत्ती नसणं. त्यातून त्रास, हल्ले होत आहेत.
- आर्थिक हिंसा. नोकरी करणाऱ्या बाईला पगार घरी देण्याचं बंधन घालणं, तिचा पगार स्वतः वापरणं.
- छुपे कॅमेरे बसवून शूटिंग करणं, अश्लील मेसेजेस पाठवणं, मुलींना लॉजवर नेऊन लैंगिक संबंधांचं शूटिंग करणं, व्हिडिओ क्लिप्स करणं अशा प्रकारची लैंगिक हिंसा वाधत आहे.

साताऱ्याच्या ॲड. वर्षा देशपांडे यांनी मात्र हिंसेकडे पाहण्याचा दृष्टीकोन आता बदलला असल्याचं म्हटलं आहे. पूर्वी अबोला धरणं, औषधपाणी न करणं, या गोष्टीही हिंसाच आहेत असं मान्य केलं जात नव्हतं. पण आता बायका बाहेर पडतात, अनेकदा माहेरची माणसं आम्हाला काही आमची मुलगी जड नाही असं म्हणू लागली आहेत. माहेरुन महिला मंडळाच्या बायका केस घेऊन येतात, त्यामुळे आता निमूटपणे हिंसा सहन करत रहायची या विचारात बदल होत आहे, असं त्यांचं निरीक्षण आहे.

# ४. उत्तर महाराष्ट्र



**आदिवसी लोकसंख्या जास्त. भूधारणा वाटप असमान, मोठे भूधारक आणि त्यासोबत मोठ्या संख्येने भूमीहीन**

स्त्री साक्षरताः ६०.४६
०-६ लिंग गुणोत्तरः सरासरी ९०७
१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः ३९.७२
७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः सरासरी ३८.४ (१९९९)

**भेटी**
दिलासा बहुद्देशीय संस्था, जळगाव
आधार बहुद्देशीय संस्था, जळगाव
जागृत महिला कृती समिती, जळगाव
आशादीप महिला वसतिगृह, जळगाव

उत्तर महाराष्ट्र विभागात एकूण ९ संस्थांची माहिती गोळा करण्यात आली. या संस्थांमध्ये व्यसनमुक्ती केंद्र आणि शासकीय आधारगृहाचाही समावेश आहे. गेली ३० वर्षं कार्यरत असणाऱ्या छात्र युवा संघर्ष वाहिनीचे अनुभवही यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या भागातील वचन ही संस्था स्त्रियांवरील हिंसा आणि आरोग्य या विषयावर काम करत आहे.

जळगावातील ५ संस्थांची माहिती व अनुभव गोळा केल्यामुळे तेथील माहिती तुलनेने जास्त प्रमाणात पुढे आली आहे. १९९२-९३ साली उघडकीस आलेल्या वासनाकांडाचा आणि त्यात बळी पडलेल्या मुलींना सहन कराव्या लागलेल्या शोषणाचाही उल्लेख यामध्ये आला आहे.

या विभागात आढळणारे हिंसेचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे-

१. क्षुल्लक कारणावरुन मारहाण, बाईला ताब्यात ठेवण्यासाठी मारहाण

२. मानसिक छळ- टोचून बोलणं, शिवीगाळ करणं, अपमानास्पद बोलणं

३. आत्महत्येसाठी प्रवृत्त करणं, वेडं ठरवणं

४. घरातून हाकलून देणं, न नांदवणं

५. हुंडा

७. लैंगिक शोषण, हिंसा

पुरुषी मानसिकता, बाई दुय्यम ही समाजाची विचारसरणी आणि रुढी-परंपरा व त्यातून बाईवर होणारी हिंसा याचा उल्लेख या विभागात प्रामुख्याने झाला आहे. नंदुरबारच्या आदिवासी भागातून आणि जळगावातील उच्च समजल्या

जाणाऱ्या जातींच्या संदर्भात हा उल्लेख विशेषकरुन आला आहे.

हिंसेच्या सर्वात जास्त आढळणाऱ्या प्रकारांमध्ये शारीरिक हिंसा आणि मारहाण हा प्रकार ९पैकी ५ संस्थांनी सांगितला आहे. मारहाणीची कारणं विविध असल्याचं या अनुभवांवरुन दिसून येतं. दारुसाठी, व्यसन केल्यानंतर तसंच पैशासाठी मारहाण होत असल्याचं दिसून येतं. 'बाईला ताब्यात ठेवण्यासाठी मारहाण करावीच लागते' या विचारसरणीमुळे मारहाणीला मान्यता मिळाल्याचं दिसतं. छात्र युवा संघर्ष वाहिनीमध्ये कार्यरत असणाऱ्या आणि जागृत महिला कृती समिती म्हणून काम करणाऱ्या वासंती दिघे यांनी याबद्दल त्यांचे अनुभव मांडले आहेत.

अतिशय क्षुल्लक कारणांवरुन (जसं की 'काळीच आहे', 'आईला किंवा स्वतःला आवडत नाही') बाईला मारहाण होतेच पण काही चुकलं तर शिक्षा म्हणूनही अमानुष मारहाणीच्या घटना घडत आहेत. वासंती दिघे यांच्या मते, पैशासाठी छळ हाही मारहाणीचा आणि इतर हिंसेचा मोठा प्रकार आहे. हुंडा आणण्यासाठी अगदी वेडीवाकडी मारहाण करणं, जाळणं हे प्रकारही इथे मोठ्या प्रमाणावर आढळतात. डबा, जेवण, हातात असेल ती वस्तू फेकणं अशा प्रकारची हिंसा कधी व्यसनाच्या तर कधी हुंड्याच्या संदर्भात घडताना दिसते.

शारीरिक छळाइतकंच मानसिक हिंसेचंही प्रमाण बरंच मोठं आहे. ४ संस्थांनी मानसिक हिंसेचे अनेक प्रकार सांगितले आहेत. टोचून बालणं, शिवीगाळ, साध्या साध्या कारणांवरुन 'तुला काही येत नाही, घरातल्या नॉर्मल गोष्टी जमत नाहीत' असं बोलत राहणं, टॉर्चर करणं, खायला न देणं हे प्रकार आढळून येतात. पण इथे आढळणारा तुलनेने तीव्र प्रकार म्हणजे प्रचंड मानसिक दडपण, आत्महत्येसाठी प्रवृत्त करणं, मनोरुग्ण ठरवणं. विशेषतः इथे जी राजकारणी लोकांची 'मोठी' मानलेली घरं आहेत तिथल्या सुनांवर प्रचंड मानसिक दबाव आहे आणि इथे मानसिक व इतर हिंसा मोठ्या प्रमाणावर आढळते.

हुंडाबळीच्या किंवा आत्महत्येला प्रवृत्त केल्याच्या प्रकरणांवरुन जर कोर्टात केस दाखल झाली तर बाईला डिप्रेशन आहे, तिचा स्वभाव विक्षिप्त आहे, ती मनोरुग्ण आहे असे दावे केले जातात. संशयावरुन छळ केला जात असल्याची नोंद केवळ नाशिकच्या महिला हक्क संरक्षण समितीने केली आहे. संगमनेरच्या भागात अपमानास्पद बोलणं हा प्रकार मारहाणीइतकाच मोठ्या प्रमाणावर होत असल्याचं ॲड. निशा शिवूरकर कळवतात.

या विभागामधील फक्त एकाच संस्थेने 'हुंडा किंवा हुंड्यासाठी छळ' या प्रकारासंदर्भाने माहिती दिली आहे. पण यातून ज्या विविध प्रकारे स्त्रियांवर हिंसा होताना दिसते ती गंभीर स्वरूपाची आहे. जळगावचा भाग हा शेती, उद्योग यामुळे समृद्ध आहे. आणि आधीपासूनच हुंड्याचं प्रमाण इथे मोठं आहे. त्यातही काही समाजात (गुजर पाटील) लाखो रुपये हुंडा घेतला जातो. हल्ली तर कोणतंही लग्न अडीच तीन लाखाखाली होत नाही असा अनुभव वासंती दिघे यांनी मांडला आहे. त्या सांगतात की, 'हुंडा हे नोकरीसाठी उद्योग्धंद्यासाठी भांडवल म्हणून वापरलं जात आहे. हुंडा/पैसे घेऊन बायकोला सोडून द्यायचं आणि दुसरं लग्न जास्त हुंडा घेऊन करायचं असे व्यवहार होत आहेत.' या भागात पैशासाठी वेडीवाकडी मारहाण हे वास्तव आहे. तक्रार केल्यास बाईला मनोरूग्ण ठरवणं, विक्षिप्त ठरवणं असे प्रकार केले जात असल्याने हुंडाबळीची केस कोर्टात उभी राहत नाही आणि मूळ प्रश्नाला बगल दिली जाते असा अनुभव आहे.

लैंगिक हिंसा व बलात्कार हा प्रकार २ संस्थांनी नोंदवला आहे. जळगावातील वासनाकांड, त्यात झालेलं मुलींचं लैंगिक शोषण याविषयीही माहिती त्यात नोंदवली गेली आहे. पण त्याव्यतिरिक्त नाशिकच्या आदिवासी भागातून लैंगिक हिंसा आणि त्यामुळे अंगावरून लाल/पांढरं जाणं, गर्भाशय खाली येणं असे प्रकार होत असल्याचं वचन संस्थेनं नोंदवलं आहे.

ट्रॅफिकिंगच्या प्रश्नावर काम करणाऱ्या आधार संस्थेने हंगामी स्थलांतराच्या संदर्भात ट्रॅफिकिंगच्या केसेस घडत असल्याचं सांगितलं आहे. ऊसतोड, बांधकाम इत्यादी कामाला नाशिक, सूरत, गुजरातेत स्थलांतर होतं. तिथे मुकादम किंवा इतर व्यक्तींकडून पैशाचं आमिष दाखवून मुलींना पळवल्याच्या घटना घडत असल्याचा अनुभव या संस्थेने नोंदवला आहे.

या सर्वच भागातून प्रकर्षाने जाणवणारा आणखी एक प्रकार म्हणजे एकट्या स्त्रियांचा प्रश्न. बायकोला सोडून देणं, सासरी नांदण्यास न नेणं, हुंडा घेऊन परत पाठवणं, माहेरी परत आलेल्या बाईला कसलंच स्थान नसणं अशा अनेक पैलूंमधून हा प्रश्न मांडला गेला आहे. जळगावमधले अनुभव विशेषत: गंभीर आहेत. इथे घटस्फोट घेणं, एकटीने राहणं अजूनही अशक्य आहे असं मत वासंती दिघे नोंदवतात. त्यांनी सांगितलेल्या एका उदाहरणातून ते दिसून येतं. अनेकदा बाईला घरातून हाकललं जातं. त्यातही जर तिला मुलगा असेल तर त्याला ठेवून घेतलं जातं, पण मुली असल्या तर मात्र मुलींसकट पाठवलं जातं. माहेरी परत आलेल्या बायांना भावांनी मारहाण करण्याच्या घटनाही नवीन नाहीत. शक्यतो सासरी परत जावं म्हणून त्यांच्यावर दबाव टाकला जातो.

इतर विभागांप्रमाणेच उत्तर महाराष्ट्रातही दोन लग्नांचं प्रमाण बरंच असल्याचं दोन संस्थांनी सांगितलं आहे. व हे आदिवासी भागातूनही दिसून येतं असा वचन संस्थेचा अनुभव आहे. जळगावच्या संदर्भाने बोलताना 'फसवणूक करून दोन लग्नं लावली जात असल्याचं' वासंती दिघे सांगतात. शिकलेल्या मुलीही फसून अशा लग्नांमध्ये अडकतात. मुलीने तक्रार करु नये म्हणून प्रचंड दबाव असतो व बहुतेक वेळा दोन लग्नं सिद्ध करणं अशक्य होतं. अशा वेळी कोर्टाबाहेर काही उपाय करुन लग्नात खर्च झालेले पैसे परत मिळवणं इतपतच मुलीकडच्यांच्या हाती असल्याचे अनुभव आहेत. या सगळ्यामध्ये मुलीचा जो भावनिक छळ होतो त्याची गणती करणं शक्य नाही असं वासंती दिघे सांगतात. एकीकडे, घटस्फोट घेणं किंवा परत येऊन एकटीनं राहणं या गोष्टींना समाजात मान्यता नाही आणि दुसरीकडे, लग्नातील फसवणूक, हुंडा, छळ! अशी इकडे आड तिकडे विहीर अशीच परिस्थिती इथे समोर येते.

**मुलांना घेऊन बाई एकटी राहू लागली तर त्या बाईच्या घरावर दिवसाढवळ्या हल्ला चढवण्यात आला. 'अमानुष अत्याचार करणाऱ्या नवऱ्यासोबत रहायचं नाही' असा निर्णय तिने त्या समाजाच्या पंचायतीत सांगितला तर तिच्या बहिणींच्या नवऱ्यांनी धमकी दिली की तिने जर घटस्फोट घेतला तर ते त्यांच्या बायकांना परत पाठवतील. त्या बहिणींची वयं ५० च्या पुढची आहेत तरी अशी भाषा वापरण्यात आली.**
**(वासंती दिघे, जागृत महिला कृती समिती, जळगाव)**

'हिंसेचं स्वरूप बदललेलं आहे का,' याबाबत सर्वच संस्थांनी मतं, अनुभव सांगितलेले नाहीत. परंतु ९ पैकी ५ संस्थांच्या मते हिंसेच्या स्वरूपात आणि स्त्रियांच्या प्रतिसादामध्ये बदल झाला आहे. तो असा –

– फसवणूक करून लग्न, आधीचं लग्न झालेलं असतं पण ते लपवून ठेवून दुसरं लग्नं करणं. त्यातही शिकलेल्या


मुलींच्या बाबतीत अशी फसवणूक वाढताना दिसते आणि मग त्याबद्दल बाहेर बोलू नये म्हणून तिच्यावर प्रचंड मानसिक दबाव येताना दिसतो.

- नवऱ्याने लैंगिक संबंध ठेवायला नकार देणं आणि त्यासाठी बायकोवरच लैंगिक वासना जास्त असल्याचे किंवा तत्सम आरोप करणं.
- पूर्वी शारीरिक मारहाण होत असे; पण आता मात्र छळ करणं, टॉर्चर करणं असा बदल दिसून येतो आहे.

पूर्वी हिंसेविरोधात तक्रार करण्याची अजिबात तयारी नसायची. बायका बोलत नसत पण आता खुलेआम तक्रार नोंदवायला येतात.

## ५. पुणे जिल्हा

**चांगल्या सिंचन सुविधा, भूधारणेचे समान वाटप, औद्योगिक विकास**




स्त्री साक्षरताः ७२.३२

०-६ लिंग गुणोत्तरः ९०२

१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः ३०.४०

७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः सरासरी २८ (१९९९)

**भेटी**
अखिल भारतीय जनवादी महिला संघटना
चेतना महिला विकास केंद्र
समाजवादी महिला सभा
सीफार
महाराष्ट्र दलित महिला फोरम

**पत्रातून माहिती**
कर्वेसमाजकार्य संस्थेचे कौटुंबिक सल्ला केंद्र
जनविकास प्रतिष्ठान, ता. मावळ,
महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ, ता. पुरंदर

**इतर माहिती**
माहेर (वेबसाइट)
सखी हेल्पलाईन (मासूम प्रकाशित अहवालातून)

पुणे विभागात एकूण १० संस्थांची माहिती घेण्यात आली. यातील ९ संस्थांमधून हिंसेच्या प्रकारासंबंधी माहिती गोळा झाली आहे. काही माहिती उपलब्ध अहवाल, वेबसाईटवरून घेतली आहे.

पुणे विभागात दिसून येणारे हिंसेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

१. आर्थिक हिंसा
२. मारहाण, दारू पिऊन मारहाण
३. मानसिक छळ
४. संशय, दारुमुळे संशय व त्यातून हिंसा
५. लैंगिक हिंसा, सार्वजनिक ठिकाणी टवाळी, अंगलटीला येणं
६. हुंडा
७. बायकोला सोडून देणं
८. दुसऱ्या स्त्रीशी संबंध
९. प्रॉपर्टी बाईच्या नावावर देखील राहू न देणं
१०. मुलगा, मुलगी, सुनेकडून आई/सासूचा छळ
११. आंतरजातीय विवाहांना विरोध
१२. वेतन, प्रतिष्ठा, कामाच्या शर्ती या संदर्भात दलित, कष्टकरी स्त्रियांवर अन्याय

मारहाण, हुंडा, मानसिक छळ या बरोबरच आर्थिक हिंसा हा कौटुंबिक हिंसेचा पैलू पुणे विभागात सर्वात जास्त दिसून येतो. स्वत: काम न करणं, बाईवर कामाची/कमवण्याची सक्ती करणं, तिच्याकडे सतत पैसे मागणं हा एक भाग; तर तिला घरात पैसे न देणं, तिच्या असहायतेचा फायदा घेणं हा दुसरा! चेतना महिला विकास संस्थेच्या असुंता पारधे सांगतात की, परिस्थिती इतकी बिकट आहे की बाया निम्मा वेळ उपाशी राहतात. कारण नवरा घरात पैसे देत नाही. 'आर्थिक शोषण हे फार मोठ्या प्रमाणावर घडत आहे. आणि नव्याने त्यासंबंधी होणारी हिंसा वाढत आहे' असं मत ७ संस्थांनी मांडलं आहे.

आर्थिक हिंसेचे बरेच पैलू नारी समता मंचाच्या अनुभवांमधून पुढे येतात. दोन प्रकारे आर्थिक हिंसा होताना दिसते. एक म्हणजे घरी पैसे न देणं किंवा अतिशय तुटपुंजी मदत करणं, ज्यातून त्या बाईवरच घरचं भागवायची जबाबदारी येते. दुसरा पैलू म्हणजे, स्वतः आर्थिक जबाबदारी न उचलता बायकोला कमवण्याची सक्ती करणं. कर्ज काढणं, कर्जासाठी गॅरेण्टर राहणं यासाठी बाईवर दबाव आणणं हा प्रकारही दिसून येत आहे. बायकोची क्रेडिट कार्डस् चोरुन त्यावरुन व्यवहार करणं, स्वतः कर्ज काढून फरार होणं; जेणेकरुन ते सर्व कर्ज फेडण्याची जबाबदारी बाईवर येईल असे प्रकार मध्यमवर्गामध्ये आढळू लागले आहेत.

'लग्नाला १८–२० वर्षं झाली आहेत, वेगळं व्हायचं आहे पण नवऱ्याचं कर्ज डोक्यावर आहे, ते फेडायचं आहे त्यामुळे घटस्फोट घेता येत नाही...' अशाही केसेस मोठ्या प्रमाणावर येत असल्याचा क्रांती यांचा अनुभव आहे.

खासकरुन सरकारी स्थिर स्वरुपाच्या नोकऱ्या करणाऱ्या बायकांना असा त्रास जास्त सहन करावा लागत आहे. नवरा कमवत नाही, त्यामुळे वेगळं व्हायचं असेल तरी पोटगी मिळण्याचा प्रश्न नाही, त्यात स्वतःचा खर्च आणि नवऱ्याचं कर्ज या साऱ्याचा ताण बाईवरच येतो आहे. आणि हे खूप मोठ्या प्रमाणावर घडत आहे.

आर्थिक हिंसेचा विचार करताना पैशाची मागणी विविध संदर्भात होताना दिसते. दारूसाठी, विविध वस्तूंसाठी, हुंडा म्हणून नाही, पण सतत काही ना काही द्यावं ही अपेक्षा, नवऱ्याचे दुसऱ्या स्त्रीशी संबंध, त्यामुळे आर्थिक शोषण अशा विविध स्वरूपात ही हिंसा होताना दिसते.

कुटुंबाच्या बाहेर, कामाच्या ठिकाणी वेतन, शर्ती यामुळे दलित कष्टकरी स्त्रियांचं आर्थिक शोषण होतं. नव्याने ही हिंसा जास्त दिसत आहे असं मत महाराष्ट्र दलित महिला फोरमच्या लता भिसे सोनवणे यांनी मांडलं आहे. आर्थिक हिंसेबाबत तक्रार करण्यासाठी स्त्रिया अजून पुढे येत नाहीत. प्रॉपर्टी, घर जर बाईच्या नावावर असलं तरी तिला तिथे राहू न देणं, त्यासाठी मुलांकडून, सुनेकडून छळ होणं या प्रकारची हिंसा सेंटर फॉर ॲडवोकसी ॲण्ड रिसर्च आणि कर्वेसंस्थेच्या समुपदेशन केंद्राने नोंदवली आहे. पुण्याच्या पुरंदर तालुक्यामधील मासूमच्या अनुभवांनुसार 'बाईला संपत्तीत वाटा न देणं' या प्रकारची हिंसा वाढत आहे.

आर्थिक कारणांशी संबंधित हिंसेनंतर जास्त प्रमाण आहे ते शारीरिक व मानसिक छळाचं. मारहाणीचं प्रमाण जास्त आहे हे खरंच; पण त्याचसोबत, तेवढ्याच तीव्रतेने मानसिक हिंसा/छळ होत आहे, असं मत ४ संस्था नोंदवतात. क्षुल्लक कारणांवरून (उदा. भाजीत मीठ का नाही घातलं) मारहाणीच्या घटना घडल्याचं, घडत असल्याचं जनवादी महिला संघटनेच्या सरस्वती भांदिर्गेयांनी नोंदवलं आहे. तर दारू पिऊन मारहाणीच्या घटना घडत असल्याचं चेतना महिला

विकास संस्थेचा अनुभव आहे. वैवाहिक आयुष्यात दुसरी स्त्री असणं आणि शारीरिक छळाच्या घटना घडणं हे वास्तव असल्याचं सखी हेल्पलाईनच्या नोंदींवरुन दिसतं.

मानसिक छळामध्ये 'संशय घेणं' हा प्रकार ७ संस्थांनी नोंदवला आहे. चारित्र्यावर संशय घेतला जाणं, तू याच्याकडे का पाहिलंस, खिडकीतून कुणाकडे पाहिलंस अशा कारणांवरून छळ होणं असा जनवादी व जनविकास प्रतिष्ठानचा अनुभव आहे. हा प्रकार नव्याने दिसू लागला आहे असं मत लता भिसे नोंदवतात. कर्वेसंस्थेच्या समुपदेशन केंद्रातही संशयग्रस्ततेच्या केसेस येतात असं त्यांनी नोंदवलं आहे. संशय घेणं या प्रकारची हिंसा सातत्याने पुढे येत आहे, असं नारी समता मंचाने म्हटलं आहे. या अनुशंगाने समाजवादी महिला सभेच्या राधा शिर्सेकर यांनी नव्या पद्धतीने संशयाची उदाहरणं सांगितली आहेत. बायकोचा मोबाईल फोन तपासणं, मेसेजेस पाहणं अशा प्रकारे हे नियंत्रण आणि संशय वाढत असल्याचं त्यांनी नोंदवलं आहे. मानसिक छळाचा एक भाग म्हणून माहेर तोडणं, मुलांना त्रास देणं, मुलांचा वापर करणं असेही प्रकार घडत आहेत.

नवविवाहित स्त्रियांबाबत लग्नानंतर लगेच होणाऱ्या छळाचं प्रमाण मानसिक छळामध्ये सर्वात जास्त असल्याचं कर्वेसंस्थेने सांगितलं आहे. मध्यमवयीन स्त्रियांचा मुला/सुनांकडून छळ होण्याच्या घटनाही वाढत आहेत असं ही संस्था नोंदवते. सखी हेल्पलाईनच्या अभ्यासानुसार जोडीदाराचं व्यसन, मानसिक आजार याचा हिंसेशी जवळचा संबंध असल्याचं दिसतं. त्यातून हिंसेबाबतचा एक वेगळा पैलू पुढे येतो.

हिंसेच्या या प्रमुख प्रकारांबरोबरच बायकोला सोडून देणं, लहान वयात लग्न आणि आंतरजातीय विवाहांना विरोध हे प्रकारही पुणे विभागात नोंदवले गेले आहेत. स्वतःच्या मर्जीने लग्न करायचं असल्यास दबावाचं प्रमाण वाढत आहे असा अनुभव समाजवादी महिला सभेने नोंदवला आहे.

हिंसेच्या स्वरूपात काय बदल होत आहेत याबाबत पुणे विभागात व्यक्त झालेली मतं पुढीलप्रमाणे –

- बदल फारसा दिसत नाही.
- सुशिक्षितांमध्येही हिंसा, आर्थिक हिंसा, पैसे मागणं दिसून येतं आहे.
- एकीकडे हिंसा तीव्र होत चालली आहे पण दुसरीकडे सर्व कायदे बायकांच्या बाजूने आहेत ही समाजाची भूमिका
- सार्वजनिक ठिकाणी टवाळी, अंगलटीला येणं, कुटुंबात संशय, आंतरजातीय विवाहांना विरोध वाढला आहे.
- पूर्वी हुंडाबळी जास्त होते, आताही हुंड्यावरून छळ पण जागृती जास्त.
- आर्थिक, लैंगिक हिंसा जास्त, पण बायका तक्रार करत नाहीत.
- मानसिक छळ, संशयग्रस्तता, नवविवाहित स्त्रियांचा मानसिक छळ वाढत आहे.
- मध्यमवयीन स्त्रियांचा मुला/सुनांकडून छळ.
- आर्थिक जबाबदाऱ्या घेण्याची सक्ती.
- एचआयव्ही, एड्सग्रस्त विधवांना संपत्तीत वाटा मिळवण्यात अडचणी.

# ६. मुंबई व ठाणे



**देशाची आर्थिक राजधानी, ठाणे विभागात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर.**

स्त्री साक्षरताः ७९.३६
०-६ लिंग गुणोत्तरः सरासरी ९२५
१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः १३.८५
७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः सरासरी २६.३३ (१९९९)

**भेटी**
महिला दक्षता समिती
सख्य
दृवाधार
आवाज इ निस्वाँ
स्त्री मुक्ती संघटना
हुंडाविरोधी चळवळ
श्रमजीवी संघटना/विधायक संसद, ता. वसई, जि. ठाणे

**इतर माहिती**
स्नेहा (वेबसाइट)
कोरो (संस्थेच्या पुस्तिकेमधून)
मजलिस (वेबसाइट)
मावा (अहवाल)

मुंबई विभागामध्ये एकूण ११ संस्थांची माहिती घेण्यात आली. यामध्ये १० संस्था मुंबई व उपनगरात काम करणाऱ्या आहेत तर १ संघटना ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागांमध्ये काम करते.
मुंबई विभागात प्रामुख्याने आढळून आलेले हिंसेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

१. मारहाण
२. मानसिक छळ
३. संशय
४. एकाहून जास्त लग्न, विवाहबाह्य संबंध
५. प्रॉपर्टीसाठी बायकोचा अथवा आईचा छळ
६. लैंगिक हिंसा
७. दारु पिऊन मारहाण
८. हुंडा
९. बायकोला सोडून देणं
१०. बलात्कार
११. गर्भलिंगनिदान
१२. चेटकीण/भुताली ठरवणं (पूर्वी)

१३. धर्माचा पगडा, धार्मिक सणात दबाव

१४. घरात पैसे न देणं

मुंबई विभागातील ११पैकी ७ संस्थांनी हिंसाचाराच्या प्रकारांबाबत माहिती दिली आहे. या विभागात मारहाण आणि मानसिक छळ या प्रकारची हिंसा सर्वात जास्त आढळत असल्याचं यातून दिसतं. पूर्वीइतकी अमानुष मारहाण होत नसली तरी मारहाण कमी झालेली नाही असं मत ४ संस्था नोंदवतात. बाईचं चुकतं म्हणून तिला मारहाण होते असं सर्रास मानलं जातं, तुझं चुकलं मग मी तुला शिक्षा करणार किंवा तिने माझं ऐकलं नाही म्हणून मी तिला मारलं असं पुरुषांचं ठाम मत असल्याचं मत महिला दक्षता समितीच्या सुधाताई कुलकर्णी आणि सख्य संस्थेच्या हिल्डा फर्नांडिस यांनी मांडलं आहे. तसंच दारु पिऊन केल्या जाणाऱ्या मारहाणीमध्ये वाढ झाल्याचं २ संस्था नोंदवतात.

मुस्लिमबहुल असलेल्या मुंब्रा भागात काम करणाऱ्या आवाज–ए–निस्वाँ या संस्थेच्या हसीना खान सांगतात की घरच्या आणि सासरच्या लोकांकडून मारहाण शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून त्रास या घटना सर्वात जास्त दिसतात. गंभीर स्वरुपाची मारहाण – फ्रॅक्चर होईपर्यंत, कंबर मोडेपर्यंत मारहाण, पट्ट्याने मारणं, सिगारेटचे चटके देणं, शरीरसंबंध न ठेवल्यास मारहाण अशा केसेस जास्त येत असल्याचं त्या सांगतात.

शारीरिक छळासोबतच मानसिक हिंसेच्या घटना घडत आहेत. आवाज–ए–निस्वाँ, स्वाधार, महिला दक्षता समिती या मुंबईतील आणि श्रमजीवी संघटना या ठाण्याच्या आदिवासी भागात काम करणाऱ्या संस्थांनी हा अनुभव मांडला आहे. मानसिक हिंसेच्या घटनांमध्ये टोचून बोलणं, शब्दांचा मार हे तर आहेच पण तासन्‌तास भांडत राहणं, रात्रभर काही ना काही कारणानं बोलत राहणं असे प्रकार जास्त आढळू लागले आहेत असा अनुभव महिला दक्षता समितीच्या सुधाताई कुलकर्णी यांनी मांडला आहे.

या प्रकारांसोबतच संशय घेण्याच्या आणि बाईच्या हालचालींवर, बाहेर पडण्यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. मुस्लिम समाजात बाईला घराबाहेर न पडू देणं, स्वतः काम न करणं व बाई कमवायला बाहेर पडत असेल तर तिच्यावर संशय घेणं आणि त्यावरुन मारहाण करणं हे प्रकार जास्त होताना दिसत आहेत, असं हसीना खान सांगतात. पुरुषांची बेरोजगारी आणि त्याबद्दलचं टेन्शन हेही स्त्रियांवरील हिंसेशी संबंधित असल्याचं त्या सांगतात. ठाण्याच्या आदिवासी भागात बायकोचं कुणाबरोबर काही आहे का, हे शोधून काढण्यासाठी पुरुष वाटेल त्या थराला जातात असा अनुभव विद्युत पंडित यांनी मांडला आहे. संघटना स्त्रियांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी सुरु झाली नसली तरी स्त्रियांवरच्या हिंसेचा प्रश्न माहेर शिबिरं आणि गावातल्या बैठकींमधून हाताळला जातो. त्यातूनच संशयाचा प्रश्न समोर आला असं त्या सांगतात. त्यांनी एका बाईची केस सांगितली; ती अशी – एका बाईला नवरा रात्र–रात्र बाहेर ठेवत असे. पण त्या बाईला धाकटी बहीण होती. तिचं लग्न ठरण्यात अडचणी येऊ नयेत म्हणून ती बाई कुणालाही काही न सांगता हिंसा सहन करत राहिली.

श्रमजीवी संघटनेने शहापूर तालुक्यात पूर्वी जी लिलाव पद्धत होती त्याबद्दलचे अनुभव सांगितले आहेत. जर एखाद्या बाईचे दुसऱ्या कोणाबरोबर संबंध आहेत असा संशय जरी आला तरी त्या स्त्रीला आणि संबंधित पुरुषाला जात पंचायतीसमोर आणण्यात येत असे. नागवं करुन पूर्ण गावातून त्यांची धिंड काढण्यात येत असे. असं करत असताना

इतर लोक त्यांना दगड मारत. संघटनेने स्वतः धाडी टाकून लिलाव बंद पाडले आहेत त्यामुळे आता अशा घटना घडत नाहीत. पण संशयावरुन समाजाने दिलेली शिक्षा कशी होती हेच यातून दिसून येतं.

एखाद्या महिलेला भुताली किंवा चेटकीण ठरवणं आणि मग तिची गावातून धिंड काढणं किंवा तिला घरातून हाकलून लावणे ही प्रथा ठाण्याच्या आदिवासी भागांमधून पूर्वी सर्रास होती. अजूनही ती काही प्रमाणात इतर आदिवासी भागातून अस्तित्वात आहे. त्यात बहुतेकवेळा गावातली मुलं, मोठी माणसं हिच्यामुळे मरतात असा ठपका बाईवर ठेवला जात असे. भुताली ठरवलेल्या बहुतेक स्त्रिया म्हाताऱ्या, विधवा अथवा एकट्या राहणाऱ्या असल्याचं दिसून आलं आहे.

मुस्लिम समाजामध्ये फसवणूक, एकाहून अधिक लग्नांचा प्रश्न मोठा असल्याचा महिला दक्षता समितीचा अनुभव आहे. लैंगिक हिंसा वाढत असल्याचं ३ संस्थांनी सांगितलं आहे. यात नवऱ्याकडून होणारी लैंगिक हिंसा तर आहेच पण विवाहित पुरुषांचे अविवाहित, वयाने लहान मुलींबरोबर लैंगिक संबंध वाढत असल्याचं मत श्रमजीवी संघटना मांडते. बलात्काराच्या घटना भिवंडी भागातून जास्त होत असल्याचं तसंच बिगर आदिवासी समाजात बलात्काराचं प्रमाण जास्त असल्याचं मत त्यांनी नोंदवलं आहे. तरुण वयात मुला–मुलींचे संबंध येतात, त्यातून मुलगी गरोदर राहते पण मुलगा जबाबदारी नाकारतो अशाही घटना वाढत आहेत असा त्यांचा अनुभव आहे.

मुंबई विभागात विशेषकरुन आढळून येणारा हिंसेचा प्रकार म्हणजे प्रॉपर्टी/जमीन/संपत्तीवरुन घरात बाईचा छळ होणं. मुंबईत जमिनीच्या किमती खूपच वाढल्या आहेत. अशा वेळी जर घर/जमीन आईच्या नावावर असेल तर तिचा त्या प्रॉपर्टीसाठी अतोनात छळ होण्याच्या घटना वाढल्याचं मत महिला दक्षता समितीने नोंदवलं आहे. मोठ्या शहरात आढळणारी ही नव्या प्रकारची हिंसा आहे असं ही समिती म्हणते. श्रमजीवी संघटनेच्या मते जमिनी विकून जिथे एकदम हातात पैसा आला तिथे असा पैसा बारवर किंवा इतर काही व्यसनांवर उडवण्याच्या आणि घरी येऊन बाईचा छळ करण्याच्या घटना जास्त दिसू लागल्या आहेत. तसंच माहेरच्या जमिनीतला/प्रॉपर्टीतला हिस्सा घेऊन येण्यासाठीही बाईवर हिंसा होत असल्याच्या घटना नव्यानेच दिसत असल्याचा श्रमजीवीचा अनुभव आहे. बिगर–आदिवासींमध्ये हे प्रमाण जास्त दिसून येत आहे.

या अनुशंगाने एक घटना नोंदवण्याजोगी आहे – बायकोच्या माहेरहून १५ लाख रुपये घेऊन एक फ्लॅट घेतला. त्याची किंमत आता कोटीच्या घरात गेली आहे. त्यामुळे आता त्या नवऱ्याला घटस्फोट हवा आहे. बिल्डरला त्याने परस्पर सांगितलं आहे की ही माझी बायको नाही. (आवाज–ए–निस्वाँ)

मुस्लिम स्त्रियांवरील हिंसेचं एक वेगळं विश्लेषण हसीना खान करतात. काही हिंसा/छळ उघड तर काही खामोश, न दिसणाऱ्या असतात. सर्वच धर्मात जणू काही धर्माची गुटी पाजल्यासारखी परिस्थिती आहे. बाईला एरवीही धड कधी खायला प्यायला मिळत नाही तरी तिने रोझे ठेवायचे. धर्माचा प्रचंड पगडा असतो. मी किती पवित्र, मी किती धार्मिक हे दाखवण्याची तिची धडपड असते. रमजानच्या काळात घरात जर काही मारहाण झाली तर त्याबद्दल कुणाला काही सांगत नाही, पोलिसात जात नाही. पाळी चालू असेल तर बायकांना रोजे ठेवता येत नाहीत, घरच्यांना पण चालत नाही. म्हणून मग पूजा वा कुठल्या सणांच्या वेळी जसं घडतं तसंच रमजानच्या वेळीही पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेणं हे सर्रास चालतं. सणाचं मोठं दडपण लोकांवर खासकरुन स्त्रियांवर असतं. ही अगदी खामोश हिंसा आहे पण तिचे परिणाम

गंभीर आहेत. रमझान संपल्यानंतर मग मारहाणीच्या किंवा इतर केसेस बाहेर यायला लागतात. इतक्या मोठ्या सणात कशाला पोलिसात जायचं, सण कशाला खराब करायचा असा विचार करुन बायका काहीच बोलत नाहीत आणि सहन करत राहतात असं निरीक्षण हसीना खान यांनी नोंदवलं आहे.

धार्मिक तेढ आणि पूर्वग्रहांमुळे कशा अडचणी येतात हेही त्यांनी सांगितलं आहे. कोणत्याही मुस्लिम पुरुषाविरोधात जर पोलिसात तक्रार दिली गेली तर पोलिस अति तत्परतेने कारवाई करतात. मारहाण करतात, लॉकअपमध्ये टाकतात. त्यामुळे पोलिसात जायचं का नाही यावर विचार करावा लागतो किंवा पोलिसांना कमी ॲक्शन घ्या असं सांगावं लागतं, असा अनुभव हसीना खान यांनी मांडला आहे.

ठाण्याच्या बिगरआदिवासींमध्ये गर्भलिंगनिदान करण्याची पद्धत सुरु झाली आहे असं मत विद्युत पंडित यांनी मांडलं आहे. पण बाकी संस्थांनी याचा फारसा उल्लेख केलेला नाही.


मुंबई विभागातील संस्थांनी नमूद केलेले नव्याने आढळून येणारे हिंसेचे काही प्रकार अथवा बदल पुढीलप्रमाणे

- विवाहबाह्य संबंध, एकाहून जास्त लग्न
- प्रॉपर्टीवरुन छळ
- शारीरिक छळापेक्षा मानसिक छळ जास्त प्रमाणात, वाढता संशय
- दारु पिऊन मारहाण
- कुटुंबात विसंवाद, विभक्तता

आणखी एक गोष्ट नोंदवायला हवी. स्त्रिया आता बोलू लागल्या आहेत, पूर्वीसारखं गप्प बसून सहन करत नाहीत, काही त्रास झाला तर त्याबद्दल तक्रार करतात त्यामुळेही हिंसा सहन करण्यामध्ये घट होत आहे. हिंसेबद्दल जास्त बोललं जात आहे. समाजातल्या सर्वच स्तरात हिंसेत वाढ झाली आहे हेही मुंबईतल्या संस्थांच्या अनुभवांवरुन दिसतं.

## ७. कोकण विभाग

**पश्चिम किनाऱ्यालगत. मुख्यः अल्पभूधारक. सिंचनाच्या सुविधांचा अभाव**



साक्षरताः सरासरी ६० टक्के, सिंधुदुर्ग ७५.८१ स्त्रीः ६८.५७
०-६ लिंग गुणोत्तरः सरासरी ९४५
१८ वर्षाखालील विवाहित मुलींची टक्केवारीः १०.३३
७ वीमध्ये शाळा गळती मुलींचं प्रमाणः सरासरी २९.६६ (१९९९)

**भेटी**
बॅ. नाथ पै सेवांगण, मालवण, जि. सिंधुदुर्ग
चेतना महिला विकास केंद्र, सिंधुदुर्ग
डॉ. रुपेश पाटकर, बांदा, सिंधंदुर्ग
दोन जिल्हा सत्र न्यायालयातील वकील, देवगड, सिंधुदुर्ग

**पत्रातून माहिती**
साहिल संस्था, संगमेश्वर, जि. रत्नागिरी

कोकण विभागातून ३ संस्थांची माहिती गोळा झाली. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील १ आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २ संस्थांची माहिती घेण्यात आली. या संस्थांव्यतिरिक्त देवगड न्यायालयातील दोन वकील आणि मनोविकारतज्ज्ञ डॉ. रुपेश पाटकर यांचे अनुभव गोळा करण्यात आले.

कोकणातील संस्थांच्या मते प्रामुख्याने आढळणारे हिंसेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

१. मारहाण, शारीरिक हिंसा
२. मानसिक छळ
३. लैंगिक शोषण, हिंसा, कुमारी माता
४. आर्थिक हिंसा, बाईची उपासमार
५. एकाहून अधिक लग्न, नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध
६. सामाजिक चालीरीती–रिवाजांमुळे बाईवर होणारी हिंसा
७. नवविवाहितांच्या आत्महत्या
८. संशय घेणं
९. पुरुषांमध्ये कमतरता असल्यामुळे मूल होत नसलं तरी त्या कारणावरून बाईचा छळ

कोकण विभागातील ३ संस्थांच्या माहितीनुसार तिथे शारीरिक छळ/मारहाण, मानसिक छळ आणि लैंगिक हिंसा मोठ्या प्रमाणावर आढळून येते. मारहाण आणि शारीरिक छळामध्ये दारु पिऊन मारहाणीच्या घटना जास्त घडतात असं मत रत्नागिरीच्या साहिल संस्थेने व्यक्त केलं आहे.

विविध तऱ्हेने बाईचा मानसिक छळ होतो हे चारही संस्था–व्यक्तींकडून आलं आहे. यामध्ये टोचून बोलणं, उलटून बोलणं, अश्लील शिव्या हे प्रकार पुढे येतात. याशिवाय सामाजिक चालीरिती, रिवाजांमुळे बाईचा छळ मोठ्या प्रमाणावर होतो असं दिसतं. देवीचा कौल नाही म्हणून नवरा–बायकोला एकत्र येऊ न देणं, बायकोला नांदायला न नेणं अशा घटना घडतात. तुझ्या घरचे करणी करतात असं म्हणून माहेरी जाऊ न देणं, घरात काही जरी घडलं तरी (अगदी कोंबडी मेली तरी) तुझा पायगुण चांगला नाही असं म्हणून छळ करणं असे प्रकार सर्रास होताना दिसतात, असा अनुभव बॅ. नाथ पै सेवांगणाच्या चारुशीला देऊलकर यांनी मांडला आहेत. लग्नानंतर होणारा छळ जास्त असल्याने नवविवाहितांमध्ये आत्महत्यांचं प्रमाण जास्त असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.

कोकणामध्ये खासकरुन सिंधुदुर्गाच्या भागातून लैंगिक शोषण, बलात्काराच्या घटना जास्त प्रमाणावर घडत असल्याचं सेवांगणाच्या अनुभवावरुन दिसून येतं. वासनाकांडाप्रमाणे अनेकांनी एखाद्या मुलीचं लैंगिक शोषण करणं व त्याच्या फिल्म बनवून/फोटो काढून त्याचा धंदा करणं हा प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहे. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा जाहीर झाल्यामुळे लॉज, हॉटेलवर वेश्याव्यवसाय वाढला आहे. त्यातूनही लैंगिक शोषण होणं आणि त्यातून पुढे या पद्धतीने हिंसा होणं असे प्रकार वाढत आहेत. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांमधून कुमारी मातांचं प्रमाण सर्वात जास्त आहे आणि त्याला ही वरील परिस्थिती काही प्रमाणात जबाबदर आहे असं मत त्यांनी नोंदवलं आहे. गावांमधून मुला–मुलींचे लैंगिक संबंध येतात पण गर्भनिरोधकं वापरली जात नाहीत. त्यातून पुढे गरोदरपण आल्यास मुलीला त्रास सहन करावा लागतो.

**संशयावरुन छळाचा उल्लेख बाकी संस्थांनी केलेला नाही. पण बांद्याचे डॉ. रुपेश पाटकर यांनी त्यांच्याकडील एक केस सांगितली. पॅरानॉइड स्किझोफ्रेनियाचा एक पेशंट त्यांच्याकडे उपचार घेत होता. त्या दरम्यान कधी तरी एक व्यक्ती त्यांच्या घरावर नाव टाकून गेली. तो माणूस तुलाच भेटायला आला होता असं म्हणून बायकोला तुळशीला साष्टांग नमस्कार घालायला सांगितलं आणि डोक्यात काठीचा घाव घालून तिला मारुन टाकलं. मानसिक आजारामुळे हिंसेची घटना घडल्याचं या उदाहरणावरुन स्पष्ट दिसतं. मानसिक आजारांबाबत समाजात जागृती नाही आणि मान्यताही नाही. अशा आजारांचा आणि स्त्रियांवरील हिंसेचा जवळचा संबंध दिसतो पण तसा काही स्टॅटिस्टिकल डेटा नाही**

**(डॉ. रुपेश पाटकर, मनोविकारतज्ज्ञ, बांदा)**

चेतना महिला संस्थेच्या असुंता पारधे यांनी हिंसेच्या गंभीर प्रकारांबाबत अनुभव मांडले आहेत. त्यांच्या मते, कोकणात पुरुष हे अतिशय आळशी आहेत, स्वतः न कमवता घरी बसून राहणं हे तिथे मोठ्या प्रमाणावर दिसतं. याचा परिणाम म्हणजे घरात पैसे न देणं, चणचण आणि त्यामुळे बायका जवळ जवळ निम्मा वेळ उपाशी राहतात, अशी गंभीर आर्थिक हिंसा कोकणात फार मोठ्या प्रमाणावर आढळते. बाईला कमावण्याची सक्ती करणं आणि यातून कामाचा वाढणारा ताण, अपुरं पोषण हीदेखील हिंसाच म्हणायला हवी. देवगड कोर्टातील दोन न्यायाधीशांनीही त्यांचे अनुभव मांडताना आर्थिक हिंसेचा उल्लेख केला आहे.

पुरुषाची एकाहून अधिक लग्नं, दुसऱ्या बाईशी संबंध, त्यावरुन छळ हेही प्रकार या भागात नोंदवले गेले आहेत. याशिवाय वेगळा प्रकार म्हणजे कोकणात पुरुषांमध्ये मूल न होण्याचं किंवा मूल न होण्यास पुरुष कारणीभूत असण्याचं प्रमाण मोठं

असावं. पण पुरुष तपासणी करत नाहीत आणि मग मूल होत नाही म्हणून बाईलाच दोषी ठरवणं आणि छळ करणं हा प्रकार चारुशीला देऊलकरांनी सांगितला आहे. यासाठी कोणताही अभ्यास झाला नसला तरी अनुभवांच्या आधारावर त्यांनी हे मांडलं आहे.

गर्भलिंगनिदानाचा उल्लेख इथल्या फक्त एकाच संस्थेने केला आहे. त्याचं प्रमाण कोकणात जास्त नाही ही एक चांगली बाजू.

हिंसेच्या स्वरुपात काय बदल झाले हे पाहताना वेगवेगळी मतं मांडण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे –

- पूर्वीपेक्षा शारीरिक मारहाणीचं प्रमाण कमी झालं आहे.
- पूर्वी हिंसेचं प्रमाण कमी होतं पण आता समाजाच्या सर्वच स्तरांमधून सगळ्याच प्रकारच्या हिंसेचं प्रमाण आणि तीव्रता वाढते आहे
- शारीरिक हिंसेपेक्षा लैंगिक हिंसा जास्त आढळते. लैंगिक शोषण, त्याच्या व्हिडिओ फिल्म्स करणं, त्या इंटरनेट इत्यादीवरुन प्रसारित करणं हा प्रकार जास्त वाढत आहे.

तथापि ट्रस्ट स्त्रिया आणि आरोग्याच्या क्षेत्रामध्ये संसाधन केंद्र म्हणून काम करते. २००० सालापासून स्त्रिया आणि आरोग्याच्या मुद्द्यावर माहिती संकलन, प्रसार आणि समन्वयाचं काम तथापि करते.

महाराष्ट्रातील सामुदायिक आरोग्य आणि विकासाच्या नाविन्यपूर्ण प्रयोगांचा भाग म्हणून आरोग्य म्हणून आरोग्य प्रशिक्षण आणि समर्थनाच्या नव्या कल्पनांना प्रोत्साहन देते. तथापि समता, लोकशाही आणि न्यायाच्या तत्त्वाचा अंगिकार करते आणि त्याला चालना देते. लोकांच्या आरोग्यविषयक व माहितीच्या अधिकारांवर आमचा ठाम विश्वास आहे. माहिती ही ताकद आहे त्यामुळेच उपेक्षित सामाजिक घटक आणि समुदायांना सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करुन देणे व माहितीचा प्रसार करणे आणि त्याच वेळी लोकांच्या स्थानिक स्वास्थ्य परंपरांना चालना देणे हे तथापिचे ध्येय आहे.

तथापि
स्त्रिया आणि आरोग्य
संसाधन संवर्धन

तथापि ट्रस्ट
७७ टि म वि कॉलनी,
मुकंदनगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी: ०२० २४२६०२६४